


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३११ ■ गुरूवार, दि.२१ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# विदर्भात उष्णतेचा हाहा:कार.....

## दिवसा हीट वेव्ह रात्री वार्म नाईट अकोला, अमरावती, वर्ध्याला ३ दिवस 'रेड अलर्ट'



प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** देशासह संपूर्ण महाराष्ट्र सध्या उन्हाच्या तीव्र झळांनी अक्षरशः होरपळून निघत आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये तापमानाने ४५ अंशांचा टप्पा ओलांडला असून, विदर्भातील परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. याच पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून आजपासून पुढील तीन दिवस विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यांना उष्णतेचा 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून या तिन्ही जिल्ह्यांमध्ये तापमान सातत्याने ४६ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले जात आहे. आज हवामान खात्याने अकोल्याचे तापमान ४७ अंश सेल्सिअस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सकाळ अकोल्याचे तापमान सरासरीपेक्षा अडीच अंश जास्त होते. ते ३०.७ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. विदर्भात सध्या हवामानाचा एक भलताच आणि अत्यंत घातक ट्रेंड पाहायला मिळत आहे. विदर्भवासीयांना सध्या दिवसा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहेच, पण आता रात्रीचीही झोप उडणार आहे. कारण विदर्भाला आता दिवसा 'हीट वेव्ह' आणि रात्री 'वार्म नाईट'चा असा डबल अटॅक सहन करावा लागणार आहे.

ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ डॉ. सुभाष टाले यांनी विदर्भातील या अभूतपूर्व तापमान वाढीचे थेट कनेक्शन समुद्राच्या वाढत्या तापमानाशी जोडले आहे. 'समुद्राचे तापमान सातत्याने वाढत असल्याने हवामानात मोठे बदल होत आहेत. यावर जर तातडीने आणि ठोस उपाययोजना शोधल्या नाहीत, तर आगामी काळात मोठ्या आणि भीषण दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो,' अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

अकोला आणि आसपासचा परिसर देशाच्या अंतर्गत भागात असल्यामुळे येथे समुद्राचा थंडावा पोहोचत नाही. परिणामी, उन्हाळ्यात जमीन लवकर आणि वेगाने तापते. जागतिक तापमानवाढीचा थेट परिणाम स्थानिक पातळीवर दिसून येत असून, उन्हाळा अधिक लांब, कोरडा आणि घातक बनत चालला आहे. वाढते शहरीकरण, रस्ते रुंदीकरण आणि अनिर्बंध बांधकामांमुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली आहे. झाडे कमी झाल्याने नैसर्गिक सावली आणि थंडावा नष्ट झाला आहे. सिमेंटचे रस्ते, उंच इमारती, टिनशेडची घरे आणि डांबरी रस्ते दिवसभर उष्णता शोषून घेतात आणि रात्रीही ती वातावरणात सोडतात. पावसाचे प्रमाण घटल्याने किंवा पाऊस उशिरा आल्यामुळे जमिनीतील ओलावा संपला आहे. कोरडी जमीन सूर्याच्या किरणांमुळे अधिक तापते.

### भीषण संकटावर उपाय काय

- मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण
- पाणीसाठे व तलाव जपणे
- छतांवर ग्रीन कव्हर / पांढरे रंग
- कमी प्रदूषण करणारी वाहतूक
- शहर नियोजनात हरित पट्टे वाढवणे

# उष्माघाताचे सहा बळी !

प्रतिनिधी २१ मे

**नागपूर :** विदर्भावर उष्णतेचा कहर दिवसेंदिवस अधिक भीषण होत असून, सूर्य अक्षरशः आग ओकत आहे. वर्ध्यात चार पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये तीन पुरुष आणि एका महिलेचा तर नागपुरात दोघांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. या सर्व घटनांची आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली असून, या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

देविदास पांडुरंग पचारे (७५, रा. डोर्ली) हे शेतात शेळ्या चारण्यास गेले होते. मात्र, ते एका झाडाखाली निपचित पडून असल्याचे दिसले. त्यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय असून, खरांगणा पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली. आर्वी येथील पारगोठाण शिवारात बेबीबाई खुशाल निमजे (६५, रा. सावंगी पोळ) या काडीकचरा वेचण्यासाठी गेल्या होत्या. त्यांना अचानक चक्कर आल्याने त्या खाली पडल्या. त्यांना रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले. तसेच आर्वी शहरातील गुरूनानक चौकात गोलू हिरामण हुमे (३५, रा. मायबाई वॉर्ड) याला दारूचे व्यसन होते. अति मद्यसेवन केलेले असल्याने त्यांना उन्हाचा तडाखा लागून त्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. या दोन्ही घटनांची आर्वी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली. एक अनोळखी वयोवृद्ध महिला नांदगाव चौकात असलेल्या दुभाजकाजवळ जाऊन झोपली ती उठलीच नाही. आपली बसचा थांबा येथे एक ४५ ते ५० वयोगटातील अनोळखी महिला बेशुद्धावस्थेत आढळली. पोलिसांनी या महिलेस उपचारासाठी मेयो हॉस्पिटलमध्ये नेले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. बुधवारी सकाळी ८.४० वाजताच्या सुमारास वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाठोडा रिंग रोड येथील स्मित बारजवळ फुटपाथशेजारी एका ४० वर्षे वयाची अनोळखी व्यक्ती बेशुद्धावस्थेत आढळली. त्यांना उपचारासाठी मेडीकलमध्ये नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

### कुठे किती पारा...

| | |
|---|---|
| वर्धा | ४७.१० |
| नागपूर | ४६.६० |
| चंद्रपूर | ४६.२० |
| अमरावती | ४६.४० |
| गडचिरोली | ४५.६० |
| अकोला | ४५.२० |
| यवतमाळ | ४५.२० |
| गोंदिया | ४४.९० |
| भंडारा | ४४.६० |
| वाशिम | ४२.६० |
| बुलढाणा | ४१.०० |

# मानधनातील वाटा पक्षनिधीत द्या भाजपचे नगरसेवकांना आदेश

प्रतिनिधी २१ मे



**नागपूर :** भाजप आर्थिकदृष्ट्या सक्षम पक्ष वाटत असला तरी भाजपने आपल्या नवनियुक्त नगरसेवकांना पक्षासाठी होणाऱ्या आर्थिक खर्चाची जाणीव राहावी, यासाठी शिस्त घालून दिली आहे. नगरसेवकांना दरमहा मिळणाऱ्या मानधनातून काही ठराविक रक्कम पक्षनिधीसाठी स्वेच्छेने जमा करण्याचे आदेश नगरसेवकांना दिले आहेत. रक्कम किती द्यायची याचे बंधन नसून तो निर्णय नगरसेवकांनी स्वेच्छेने घ्यायचा आहे.

महापालिकेत भाजपचे १०२ नगरसेवक निवडून आले. सोबतच ७ स्वीकृत नगरसेवक आहेत. नगरसेवकांना दरमहा २० हजार रुपये मानधन मिळते. भाजपकडून सतत कार्यक्रम राबविले जातात. पक्षाचे अधिवेशन, शिबिर, मेळावे सुरू असतात. नवनियुक्त नगरसेवकांसाठी निवासी प्रशिक्षण आयोजित केले जाते. संघटनेच्या कामावरही पैसा खर्च होतो. या सर्व खर्चासाठी नगरसेवकांचा आर्थिक हातभार लागावा, यासाठी दरमहा मानधनातील काही रक्कम पक्षनिधीसाठी देण्याची पद्धत सुरू करण्यात आली आहे. ही रक्कम नगरसेवकांना स्वेच्छेने द्यायची आहे. त्यामुळे आपल्या आर्थिक क्षमतेनुसार काही नगरसेवक ३ हजार रुपये, तर काही नगरसेवक ५ हजार रुपये देत आहेत. आर्थिक संपन्न असलेले काही नगरसेवक तर आपले पन्नास टक्के मानधन म्हणजे १० हजार रुपये पक्षनिधीसाठी देत आहेत. महापालिकेकडून नगरसेवकांच्या बँक खात्यात मानधन जमा झाले की भाजपच्या नगरसेवकांना ठरलेला पक्षनिधी महापालिकेतील सत्तापक्ष नेते कार्यालयात जमा करावा लागतो.

# कॉकरोच जनता पार्टीवर पहिली कारवाई

प्रतिनिधी २१ मे

**मुंबई :** देशभरात सध्या कॉकरोच जनता पार्टीची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. अवघ्या ६ दिवसांत कॉकरोच जनता पार्टीने इन्स्टाग्रामवर १३ मिलियन फॉलोअर्स झाले आहेत. कॉकरोच जनता पार्टीने इन्स्टाग्रामवरील फॉलोअर्सच्या संख्येत भाजपलाही मागे टाकलं. तर काही तासांत काँग्रेसच्या फॉलोअर्सलाही कॉकरोच जनता पार्टी मागे टाकणार असल्याचं दिसून येत आहे. मात्र याचदरम्यान एक महत्वाची माहिती समोर आली आहे.

कॉकरोच जनता पार्टीच्या एक्स अकाऊंटवर कारवाई करण्यात आली आहे. कॉकरोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट भारतात बंद करण्यात आले आहे. प्रचंड लोकप्रियतेनंतर कॉकरोच पार्टीचं एक्स अकाऊंट बंद केलं आहे. एक्सच्या अकाऊंट बंद करण्यामागील सध्या अधिकृत कारण समोर आलेलं नाही. कॉकरोच जनता पार्टी संस्थापक अभिजीत दीपके यांनी याबाबत स्वत: माहिती दिली. इन्स्टाग्राम अकाऊंट देखील बंद करण्याचा प्रयत्न केला जात होता. परंतु ते बंद न झाल्यामुळे आमचं एक्स अकाऊंट भारतात बंद करण्यात आलं, असं अभिजीत दीपके यांनी सांगितले. आमची ४ दिवसांची पार्टी आहे. आम्ही काहीही ठरवून केलेलं नाही.

# पेट्रोल-डिझेलचा राज्यात पुरेसा साठा !

प्रतिनिधी २१ मे




**मुंबई :** राज्यात केवळ एक महिना पुरेल इतकाच पेट्रोल-डिझेलचा साठा उपलब्ध आहे,' असे वक्तव्य अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी बुधवारी केले. त्यानंतर, 'कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. आपल्याकडे पुरेसा इंधनसाठा उपलब्ध आहे,' अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

केरोसीनचा मुबलक साठा उपलब्ध असून, पुरवठादारांची साखळी पूर्ववत करण्यावर भर देत असल्याचे छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले. भुजबळ यांच्या वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी टीका केली आणि मुख्यमंत्र्यांनी याविषयी खुलासा करावा, अशी मागणी केली. त्यावर, 'जागतिक स्थिती वाईट असतानाही आपल्याकडे पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा ठेवण्यात सरकार यशस्वी ठरले आहे. केंद्र सरकारनेही वारंवार स्पष्ट केले आहे, की पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यात काही ठिकाणी पेट्रोलपंपांवर रांगा लावून लोक पेट्रोल-डिझेल खरेदी करीत असल्याच्या बातम्या आल्या आहेत. त्या संदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले, इंधन पुरवठ्याची आपल्याकडे वर्षानुवर्षे ठरलेली अशी पुरवठा साखळी आहे. पण जेव्हा अफवा उठवल्या जातात तेव्हा अनपेक्षितपणे खरेदी वाढते. त्यामुळे पुरवठा साखळीवर परिणाम होतो.

# रेल्वे भरती आंदोलन प्रकरणी राज ठाकरे निर्दोष !

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना २००८मधील रेल्वे भरती हिंसाचार प्रकरणी निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. पुराव्यांअभावी राज ठाकरे यांच्यासह इतर सहकाऱ्यांचीही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ठाणे कोर्टाने हा मोठा निर्णय दिला आहे. आज निकालाचं वाचन करताना कोर्टाने हा महत्त्वाचा निर्णय दिला आहे. त्यामुळे मनसेमध्ये जल्लोषाचं वातावरण निर्माण झालं आहे.

सन २००८ मध्ये मुंबई आणि ठाणे परिसरामध्ये रेल्वे भरतीच्या परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. या भरती प्रक्रियेत महाराष्ट्राबाहेरील (परप्रांतीय) उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर बोलावण्यात आल्याचा आरोप करत मनसेने 'मराठी मुलांच्या' हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडले होते. या आंदोलनादरम्यान ठाणे आणि कल्याण परिसरात मोठ्या प्रमाणावर तोडफोड आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या होत्या. याप्रकरणी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यासह त्यांच्या अनेक सहकाऱ्यांवर चिथावणीखोर वक्तव्य करणे आणि हिंसाचार घडवून आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते.

# नीटचा पेपर मुलासाठी खरेदी करणाऱ्या पहिल्या पालकाला अटक !

## नीट पेपरफूट प्रकरण : सीबीआयच्या कारवाईने इतर पालकांमध्ये खळबळ

प्रतिनिधी २१ मे

**पुणे :** देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून आणखी एका आरोपीला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेला हा आरोपी बालरोगतज्ज्ञ असून डॉ. मनोज शिरुरे असे त्याच नाव आहे.

मनोज शिरुरे याने शिवराज मोटेगावकरकडून स्वतःच्या मुलासाठी पेपर खरेदी केल्याचा आरोप आहे. नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने मनोज शिरुरेला लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणलं होतं. या चौकशीनंतर मनोज शिरुला सीबीआयने अटक केली. डॉ. मनोज शिरुरे मूळचा लातूरचा आहे. आतापर्यंतच्या कारवाईतील ही पहिली अटक आहे, जी एखाद्या विद्यार्थ्याच्या पालकाला झालेली आहे. आतापर्यंत ज्यांनी नीटचा पेपर फोडला, नीटचा पेपर विकला...यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. परंतु आता नीटचा पेपर स्वत:च्या मुलासाठी खरेदी करणाऱ्या पहिल्या पालकाला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. त्यामुळे नीट पेपरफुटी प्रकरण आणखी गडद होत आहे. लातूर शहरात नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची कारवाई आणखी वेगाने सुरू असून, आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांच्या नेटवर्कमधील संशयितांवर तपास यंत्रणांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.




# देशात आणखी एका पक्षाची एन्ट्री !

## 'कॉकरोच जनता पार्टी'ची सोशल मीडियावर धूम, फॉलोअर्समध्ये भाजपलाही टाकले मागे

प्रतिनिधी २१ मे




**छत्रपती संभाजीनगर :** देशभरात सध्या कॉकरोच जनता पार्टीची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. अवघ्या ६ दिवसांत कॉकरोच जनता पार्टीने इन्स्टाग्रामवर १०० लाख (१०Med) फॉलोअर्सचा आकडा पार केला आहे. कॉकरोच जनता पार्टीने फॉलोअर्सच्या संख्येत भाजपलाही मागे टाकलं. तर काही तासांत काँग्रेसच्या फॉलोअर्सलाही कॉकरोच जनता पार्टी मागे टाकणार असल्याचे दिसून येत आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील अभिजीत दीपके या मराठी मुलाने स्थापन केलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'चा (सीजेपी) कलमी जाहीरनामा सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. न्यायव्यवस्था, निवडणूक प्रक्रिया, महिला आरक्षण, माध्यम स्वातंत्र्य आणि पक्षांतर यांसारख्या मुद्यांवर आक्रमक भूमिका घेणाऱ्या या जाहीरनाम्यामुळे राजकीय वर्तुळातही चर्चा रंगू लागली आहे. महिला सक्षमीकरणावर भर देत संसदेत महिलांना ३३ टक्क्यांऐवजी ५० टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. कॉकरोच जनता पार्टीने जाहीरनाम्यात केंद्र आणि राज्यातील कॅबिनेट मंत्रीपदांपैकी निम्मी पदे महिलांसाठी राखीव ठेवण्याची भूमिकाही मांडण्यात आली आहे. माध्यम स्वातंत्र्याच्या मुद्यावरही सीजेपीने थेट भूमिका घेतली आहे. अंबानी आणि अदानी समूहांच्या मालकीच्या सर्व माध्यम संस्थांचे परवाने रद्द करण्याची घोषणा करण्यात आली असून, तथाकथित मीडिया' अँकर्सच्या बँक खात्यांची चौकशी करण्याची मागणीही कॉकरोच जनता पार्टीने जाहीरनाम्यातून केली आहे.

### पक्ष प्रवेशाच्या चार अटी !

अभिजीत दीपके या तरुणाने 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना केली आहे. हा पक्ष जॉइन करण्यासाठी काही अटी ठेवण्यात आल्या आहेत. आमचा पक्ष जॉइन करण्यासाठी तुम्ही बेरोजगार, आळशी, सतत ऑनलाइन असणारे आणि योग्य मार्गाने संताप व्यक्त करण्याची क्षमता असणारे असायला हवात.

### कोर्टाने संबोधले होते झुरळ!

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी काही दिवसांपूर्वी एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान काही बेरोजगार तरुणांना झुरळांची उपमा दिली होती. 'त्यांनी बेरोजगार तरुणांना झुरळांची उपमा दिल्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली. अशातच महाराष्ट्रातील एका तरुणाने यावर उपहासात्मक कृती करत थेट 'कॉकरोच जनता पार्टी' या नावाने पक्षाची स्थापना केली आहे.

३

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. २१ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## अकोट - राहणापूर बससेवा नियमित सुरू करण्याची मागणी

**अकोट :** आकोट ते राहणापूर या बसफेऱ्या नियमित सुरू करण्याची मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल आकोटच्या वतीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या आकोट आगार प्रमुखांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राहणापूर, कासोद, शिवपूर या आदिवासी बहुल गावांतील



मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी बोर्डी व आकोट येथे दररोज प्रवास करतात. या भागात राज्य परिवहन मंडळाच्या बसेसशिवाय अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विद्यार्थ्यांचा वेळ व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तसेच शिक्षणासाठी प्रवास अधिक सोयीस्कर व्हावा यासाठी आकोट आगारातून दररोज सकाळी १० वाजता व सायंकाळी ५ वाजता आकोट ते राहणापूर बससेवा नियमित सुरू करावी.

# अकोला जिल्हा किसान काँग्रेसचा एल्गार

## शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण

प्रतिनिधी २१ मे

**बाळापुर :** येथे किसान काँग्रेस अकोला जिल्ह्याच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत राज्य आणि केंद्र सरकारच्या कृषी धोरणांवर जोरदार टीका करण्यात आली. राज्यातील एकाही शेतकऱ्याला अजूनही घोषित कर्जमाफीचा लाभ झालेला नाही. कर्जमाफीचे निकष जाहीर झाले नाही त्यामुळे शेतकरी व बँक प्रशासनात मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. शेतकरी नवीन पिक कर्जास पात्र नाही व खरीप हंगाम तोंडावर आला आहे. शेतकऱ्यांचे हंगामाचे नियोजन पूर्णपणे कोसळेले दिसत आहे. सरकार या संदर्भात अजिबात गंभीर दिसत नाही असा स्पष्ट आरोप अकोला जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष रवी पाटील अरबट यांनी केला.

अकोला जिल्हा किसान कॉंग्रेस ने जाहीर केले कि संपूर्ण महाराष्ट्रात एकतरी कर्जमाफीचा शेतकरी लाभार्थी दाखविल्यास सरकारला बक्षीस देण्यात येईल. सरकार फक्त घोषणा देण्यातच पटाईत आहे. प्रत्यक्ष कधी व कुणाला लाभ मिळणार या संदर्भात कोणतीही स्पष्टता नाही. सरकारने जाणीव पूर्वक शेतकरी समाजात संभ्रम निर्माण केला. खरीप हंगाम तोंडावर आहे पण सरकार व या वर्षीचा पावसाळा अनिश्चित आहे परंतु सरकार या आव्हानांचा कसा सामना करणार याचा कोणताही आराखडा सरकार जवळ तयार नाही.

बी-बियाणे, खते, कीटकनाशके तसेच इतर कृषी निविष्ठांच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या असून शेतकरी आर्थिक



संकटात सापडल्याचे किसान काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. अत्यंत गंभीर असे आर्थिक संकट समोर दिसत असतांना सरकार मात्र भंपक घोषणांमध्ये अडकले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, डीएपी, एनपीके, सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच विविध पिकांच्या बियाण्यांच्या किंमतींमध्ये गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे. कृषी निविष्ठांच्या वाढत्या दरामुळे हेक्टरी उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला आहे. अनेक भागांत खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याच्या तक्रारी असून शेतकऱ्यांना जास्त दराने खते खरेदी करावी लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले. डीझेल चा प्रचंड तुटवडा आहे व शेतीची कामे त्यामुळे खोळंबली आहेत. सरकारचे या परिस्थितीवर अजिबात नियंत्रण नाही असा आरोप करण्यात आला. येत्या कृषी हंगाम म्हणजेच वर्ष २०२६-२७ हे शेतीच्या दृष्टीने अत्यंत आवाहनात्मक आहे परंतु दुर्दैवाने सरकारी यंत्रणा या सर्व प्रश्नांकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष करीत आहे असा गंभीर आरोप शेतकरी नेते प्रशांत गावंडे यांनी केला.

पत्रकार परिषदेला अकोला जिल्हा किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवी पाटील अरबट, बाळापुर नगरपालिकेचे नगराध्यक्ष जम्मू सेठ, प्रदेश सचिव अक्षय राऊत, राज्य सरचिटणीस रवि पाटील लांडे, किसान काँग्रेस तालुका अध्यक्ष गोपाल भोंडे, शहर अध्यक्ष अक्रम खान, विध्यार्थी संघटनेचे प्रसाद धुमाळे, मजहर शेख (अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष), जयराम सोनाने (ध्ँ सेल शहर अध्यक्ष), रईस अहेमद कुरेशी (सेवादल अध्यक्ष), शेतकरी नेते प्रशांत गावंडे व अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या सोबत राष्ट्रवादीचे संदीप पाटील यांची चर्चा



प्रतिनिधी २१ मे


**बाळापूर :** बाळापूर विधानसभा मतदारसंघ विकास कामाबाबत मागसलेला असून विकासात्मक कामे तसेच शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पांदण रस्ते जलसंधारण बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अकोला लोकसभा समन्वयक संदीप पाटील यांनी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व खासदार पार्थ पवार यांची भेट घेऊन बाळापूर विधानसभा मतदारसंघातील विकासा बाबत चर्चा करण्यात आली.


बाळापूर विधानसभा मतदार संघात विकासात्मक कामे पाहिजे तसे होऊ शकत नसल्यामुळे शेतकऱ्यांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबात संदीप पाटील यांनी चर्चा केली. तसेच अकोला जिल्हामध्ये पक्षाची परिस्थिती गंभीर असून याबाबत सुध्दा चर्चा करण्यात आली.

बाळापूर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी लवकरच निधी देण्याचे आश्वासन तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्यात येणार असल्याचे मत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई ताई पवार यांनी राष्ट्रवादीचे अकोला लोकसभा समन्वयक संदीप पाटील यांना आश्वासन दिले.

## किंग अँड क्विन अँड रोझ ब्युटी सलोन कडून केटी सेमिनार आयोजित

### मंगलदास मार्केटमधील वखारिया काँम्प्लेक्समध्ये यशस्वी आयोजन






**अकोला :** येथील मंगलदास मार्केट मधील वखारिया काँम्प्लेक्स मध्ये किंग अँड क्विन अँड रोझ ब्युटी सलोन कडून उत्कृष्ट केटी प्रोफेशनल सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन कोमल श्याम लते, सचिनसिंग ठाकूर, शुभम ठाकूर आणि निर्मल मनवानी यांच्या पुढाकाराने केले होते. ज्यांनी अनेक विद्यार्थ्यांना सोबत घेऊन या सेमिनारचे व्यवस्थापन केले.

युवक युवती मध्ये व्यक्तिमत्त्वाला निखार देणा-या केश रचनेची क्रेझ असते. या महत्त्वाच्या मुद्यावर सेमिनार मध्ये भर देण्यात आला होता. टिळक मार्गावर मंगलदास मार्केट मधील वखारिया काँम्प्लेक्स मध्ये सेमिनार आयोजित करण्यात आला होता. अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे या कार्यक्रमात अनेक लोक सहभागी झाले होते आणि खूप यशस्वी ठरला. किंग अँड क्विन अँड रोझ ब्युटी सलोन कडून सेमिनार आयोजित केले जातात.

## आजपासून जनगणना कार्यास प्रत्यक्षात प्रारंभ

प्रतिनिधी २१ मे



**अकोला :** भारताची जनगणना-२०२७ कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली असून अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पहिल्या टप्प्यामधील आज दि. २० मे पासून जनगणना कार्याची सुरूवात झाली आहे.

या अनुषंगाने २० मे २०२६ रोजी अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व क्षेत्रांतर्गत एच.एल.बी.क्रं. २२३ मध्ये जिल्हाधिकारी अकोला यांचे निवासस्थान अनुक्रमांक एकवर असल्यामुळे (इमारत क्रं.१ घर गणना क्रं.१) येथील विक्रम क्रं. २२३ ची सुरुवात वर्षा मीना, जिल्हाधिकारी, अकोला यांच्या घरापासून जनगणनेला प्रत्यक्षात सुरू करण्यात आली आहे.

यावेळी उपायुक्त प्रशासन तथा शहर जनगणना अधिकारी दिलीप जाधव, चार्ज अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त पूर्व झोन राजेश सरप, पर्यवेक्षक अनंत अरविंद गद्रे, गट २२३ प्रगणक रुपेश प्रल्हाद हातोले, देवलाल पुंडलिकराव सदाशिव, जी.आय.एस.विभाग प्रमुख चंदन प्रसाद आदींची उपस्थिती होती. जनगणना-२०२६ च्या अनुषंगाने आजपासून जनगणना कार्यास प्रत्यक्षात सुरूवात झाली असून शहरातील नागरिकांनी, उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता आलेल्या प्रगणकाला आयकार्ड बघून आपल्या भारतीय संस्कृती प्रमाणे प्रगणकास घरात बसवून त्यांनी विचारलेली माहिती तातडीने देऊन या राष्ट्रीय कामामध्ये सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी वर्षा मीना, जिल्हाधिकारी, अकोला यांनी केले आहे. सहायक उपायुक्त तथा चार्ज ऑफिसर राजेश सरप, उपआयुक्त जाधव, पर्यवेक्षक अनंत गद्रे, प्रगणक देवलाल सदानशिव यांच्या हस्ते जिल्हाधिकारी मीना यांचे स्वागत करून जनगणनेला सुरुवात करण्यात आली. ह्यावेळी रुपेश हातोले, सारिका माद्रे, सविता पांडे, सविता वाजपेयी, सविता घनमोड, तसेच सुकेशनी सदांशिव उपस्थित होते.

## पी.एम. श्री. मनपा वरिष्ठ प्राथमिक शाळा क्र. ७ मधील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** स्थानिक मनपा शाळा क्र. ७ येथील शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला. इयत्ता ५ वी चे ३२ पैकी ३२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये पात्र ठरले. या यशाचे श्रेय त्यांच्या वर्गशिक्षिका व मार्गदर्शक नयना गोटे व सौ. भावना इटकीकर यांना जाते. तसेच इयत्ता ८ वीचे १० विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरले. ज्याचे श्रेय त्यांच्या वर्गशिक्षिका सौ. जयश्री वानखडे यांना जाते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मंदा खिरोडकर व संपूर्ण स्टाफ पवार, सौ. घनबहदूर, सौ. पांडे, सौ. नवलकार, सौ. सदाफळे, सौ. अपर्णा नाईक, सौ. रुपालीताई तायडे व संपूर्ण पालकवर्ग यांचेही या यशामागे योगदान आहे. अध्यक्ष राजेश गावंडे, शिक्षणाधिकारी इटकर यांनी यशाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक व शाळेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## अ. भा. ब्राह्मण महासंघ अकोला कडून २७ मे रोजी शरद पोंक्षे यांचे व्याख्यान



**अकोला :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीच्या पूर्व संध्येला अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अकोलाच्या वतीने सुप्रसिध्द अभिनेते व ओजस्वी व्याख्याते शरद पोंक्षे यांचे 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. बुधवार २७ मे रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह येथे सायंकाळी ६.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. बंधु भगिनींनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष श्याम कुळकर्णी केले आहे.

## शिरताळा येथे श्रीमद भागवत कथा व हरिनाम सप्ताहाची सांगता

प्रतिनिधी २१ मे

**मुर्तिजापुर :** तालुक्यातील शिरताळा येथे महंत १००८सिताराम महाराज यांच्या कृपेने व श्री वै . समर्थ सदगुरु श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त श्रीमद भागवत कथा व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह हनुमान मंदिर येथे पार पडला आहे. या आध्यात्मिक सोहळ्याचा शुभारंभ ९ मे रोजी तर सांगता १६ मे रोजी झाली.

सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व ज्ञानेश्वर महाराज कळंबेश्वर यांनी केले. शुक्रवार १५ मे रोजी गावातुन भव्य मिरवणुक काढण्यात आली. शनीवार १६ मे रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व गुरुवर्य तुकाराम महाराजा सखारामपुरकर यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर १२ ते ५ वाजेपर्यत महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या महाप्रयादा चे अन्न दाते लखन खेमराज यादव हे होते. सप्ताहात सोपान महाराज डिक्कर. ज्ञानेश्वर महाराज



लाहुळकर. गजानन महारज गोंडचवर. हरि ओम महाराज सोनोने गणेश महाराज कराळे अवीनाश महाराज खोकले आदिंनी आपली सेवा अर्प न केली.ग गायनाचार्य विष्णू महाराज रावण कार. गणेश महाराज देशमुख. टाळकरी मंडळी शिरताळ, बोर्टा. गुंजवाडा आदींनी आपली सेवा दिली. सप्ताहा कार्यक्रम यशस्वी करण्या करीता आयोजक उद्वव भोपळे. माधव भोपळे. गोपाल बांबल. ओम बांबल. संजय थेटे. रोहीत मालठाने. रमेश चरपे. ज्ञान श्वर चरपे. योगेश बांबल. सतिष कडू. रामदास बांबल. क्रिष्णा बांबल. सतीष बांबल. हर्षल भोपळे महीला पुरुष यांनी परिश्रम घेतले.

## ई फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांचा कडकडीत बंद



**अडगांव बु. :** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कॉर्पोरेटरव्दारे अव्यावसायीक स्पर्धे विरोधात २० मे रोजी बंद पुकारण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलनाला अडगांव बु मेडिकल असोसिएशनने जाहीर पाठिंबा देत गावांत कडकडीत बंद पाळला.

येथे असलेल्या एकूण ११ मेडिकल दुकानदारांनी या बंदमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सकाळपासूनच सर्व औषधांची दुकाने कडकडीत बंद ठेवण्यात आली होती. ऑनलाईन औषध विक्रीच्या माध्यमातून ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असून, यामुळे किरकोळ औषध विक्रेत्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अडगांव बु मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक, सचिव अक्षय बेदरकार, नरेंद्र मानकर, गजानन नेमाडे ,ऋषीकेश राजनकार , सौ.महानौर ,यांच्या सह सर्वांनी एकत्र येत या बेकायदेशीर ऑनलाईन विक्रीचा तीव्र शब्दांत निषेध केला. सर्व विक्रेत्यांनी आपल्या खिशाला काळ्या फिती लावून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

## महानगरात प्रथमच श्री श्याम श्री महाकाल महोत्सवाचे आयोजन

### श्याम व महाकाल भक्तांसाठी भक्तिसंगीताचा अपूर्व संगम

प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** महानगरातील श्री श्याम प्रेमी सावरे ग्रुपच्या वतीने राजराजेश्वर नगरीच्या इतिहासात प्रथमच श्री श्याम-महाकाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील दिग्गज भजनकारांची उपस्थिती महानगरात संगीतमय श्याम व महाकाल भजनांचा भक्तीभाव निर्माण करणार असल्याची माहिती श्री श्याम सावरे समूहाच्या वतीने देण्यात आली. गीता नगर परिसरातील रामदेवबाबा- श्याम बाबा मंदिरात बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत या भक्ती संगीत महोत्सवाची संपूर्ण माहिती देण्यात आली.



श्री शाम प्रेमी सावरे ग्रुपच्या वतीने प्रथमच येणाऱ्या मोठया एकादशीच्या पावन दिनी बुधवार दिनांक २७ मे रोजी सायं ६-३० वाजता मुर्तीजापुर रोडवरील सिटी स्पोर्ट क्लब मध्ये श्रीश्याम -महाकाल महोत्सव सर्व श्यामबाबा व महाकाल भक्तांसाठी होणार आहे. या महोत्सवात कोलकत्ता येथील भक्तिसंगित्ताची जोडगोळी भजनकार शुभम रुपम

तसेच उज्जैन येथील भजनकार किशन भगत हे श्याम बाबा-महाकाल यांच्या भजनांच्या माध्यमातून भक्तीभावाचा गौरव साकार करणार असून त्यांना महानगरातील भजन गायक पंडित उमेश शर्मा उर्फ डब्बू तथा भजन गायिका नेतल शर्मा हे साथसंगत करणार आहेत. खाटू नरेश भगवान श्री शामबाबा तथा महाकाल यांचा सुरेख संगम या संगीतमय महोत्सवाच्या माध्यमातून प्रथमच अकोलेकर भक्तांना श्रवण करावयास मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली असून खाटू धामच्या धर्तीवर श्री श्यामबाबांची भव्य झाकी साकार करण्यात येणार असून अखंड दिव्य ज्योत व दर्शन व्यवस्था भक्तांसाठी राहणार आहे. खाटू नरेश श्री श्याम व श्री महाकाल यांच्या भजनांचा अद्भुत संगम प्रथमच आयोजित करण्यात आला. असून याचा महानगरातील सर्व श्री शाम व महाकाल भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पत्रकार परिषदेत यावेळी श्याम प्रेमी सावरे ग्रुपचे कल्पेश उर्फ मोंटू अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, सचिन अग्रवाल, आयुष अग्रवाल, सूरज अग्रवाल, तेजस अग्रवाल, रोहित रूंगटा पवन बाहेती, सूरज अग्रवाल दीपक क.अग्रवाल, रोहन अडगांवकर, नितिन मिसकीन, कृष्ण सारडा, राजू शर्मा, लोकेश चिटनिस, दीपक अग्रवाल, सुनील कोरडिया समवेत सेवाधारी उपस्थित होते.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

**मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

**गायत्री नगर. अकोला**

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

**वैशिष्ट्ये :**

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

**इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.**

- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २१ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# धारदार शस्त्राने ‘येडा’ची हत्या

प्रतिनिधी २१ मे





**यवतमाळ** : गुन्हेगारी वर्तुळात ‘येडा’ नावाने परिचीत असलेल्या युवकावर धारदार शस्त्राने सपासप वार करुन त्याची हत्या करण्यात आली. ही घटना शहरातील जामणकर नगरात आज गुरुवारी सकाळी ७ ते ७.३० वाजताच्या सुमारास घडली. पैश्यातच्या वादातून ही हत्या झाल्याची चर्चा आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

सचिन उर्फ येडा छगन राठोड वय ३२ रा. बोथबोडन ह.मु. जामणकर नगर यवतमाळ असे मृतकाचे नाव आहे. शाहिद उर्फ बकुल रशीद शेख रा. इंदिरा नगर यवतमाळ असे आरोपीचे नाव आहे. सचिन राठोड हा खासगी कंपनीत वाहन सिजिंगचे काम करीत होता. बुधवारी सकाळी तो मित्रांसह घोडेराव चौक परिसरातील हनुमान मंदिराजवळ बसला असताना आरोपी बकुल उर्फ शाहीद शेख हा एका साथीदारासह तेथे आला. सुरुवातीला त्याने मोईन काझी याला बोलावून चर्चा केली. काही वेळाने त्याने सचिन राठोड याला “पाच मिनिट बोलायचे आहे” असे सांगून जवळ बोलावले. यावेळी गाडी फायनान्सच्या पैशांच्या व्यवहारावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होताच आरोपीने कमरेतील चाकू काढून सचिनवर सपासप वार केले. मध्ये पडलेल्या मोईन काझी व जिशान यांनाही किरकोळ दुखापत झाली. जखमी अवस्थेत सचिन जीव वाचवण्यासाठी पळाला. मात्र आरोपीने त्याचा पाठलाग करून विदर्भ हौसिंग सोसायटीतील सांस्कृतिक भवनासमोर पुन्हा वार केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. गंभीर जखमी अवस्थेत मित्रांनी सचिनला शासकीय रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला असून, पुढील तपास सुरु आहे.

## शिक्षक पात्रता परीक्षा २८ जूनला होणार; ४७ केंद्रांची व्यवस्था

प्रतिनिधी २१ मे

**यवतमाळ** : महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२६ ची तारीख बदलण्यात आली असून आता ही परीक्षा दि. २८ जून २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. यापूर्वी परीक्षा २१ जून रोजी आयोजित करण्यात आली होती. मात्र त्याच दिवशी राष्ट्रीय परीक्षा संस्थेमार्फत देशभरात नीट परीक्षा होणार असल्याने आणि दोन्ही परीक्षांची अनेक केंद्रे समान असल्यामुळे परीक्षार्थींच्या सोयीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) ची २१ जून ऐवजी २८ जून रोजी होणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथ) प्रकाश मिश्रा यांनी दिली. जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षेच्या पहिल्या पेपरसाठी ५ हजार १९१ तर दुसऱ्या पेपरसाठी ६ हजार ८५४ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. ही परीक्षा दोन सत्रांमध्ये होणार असून पहिला पेपर सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत, तर दुसरा पेपर दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे. पहिल्या पेपरसाठी जिल्ह्यात १९ परीक्षा केंद्रांची तर दुसऱ्या पेपरसाठी २८ परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षार्थींनी १६ जून ते २८ जून २०२६ या कालावधीत ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत काढून घ्यावी तसेच परीक्षेच्या बदललेल्या तारखेची नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा यांनी केले आहे.

# बाभुळगावात औषध विक्रेत्यांचा तीव्र एल्गार!




प्रतिनिधी २१ मे

**बाभुळगाव** : केंद्र सरकारकडे वारंवार केलेल्या पाठपुराव्याला प्रतिसाद मिळत नसल्याने बाभुळगाव तालुक्यातील औषध विक्रेत्यांनी आज आक्रमक भूमिका घेतली. तालुक्यातील ३२ मेडिकल दुकाने पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट (AIOCD) आणि महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या देशव्यापी बंदला बाभुळगाव तालुक्यात १०० टक्के प्रतिसाद मिळाला.

बंदच्या निमित्ताने शहरातून मूक मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर औषध विक्रेत्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन बाभुळगाव तहसीलदार मीरा पागोरे यांच्या हाती सुपूर्द केले.

**औषध विक्रेत्यांच्या प्रमुख मागण्या** : ई-फार्मसी बंद करा: ऑनलाइन औषध विक्री तात्काळ थांबवावी.

### ग्रामीण भागातही पूर्ण बंद

■ यवतमाळ जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने या बंदला पूर्ण पाठिंबा जाहीर केला होता. बाभुळगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेच्या नेतृत्वाखाली केवळ शहरात नव्हे तर ग्रामीण भागातही कडकडीत बंद पाळण्यात आला.

**अव्यावसायिक डिस्काउंटवर निर्बंध** : कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या भरमसाठ आणि अव्यावसायिक सवलतींना आळा घालावा. बनावट औषधांवर नियंत्रण: जनतेच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी ‘कोविड जीएसआर २२०’ हा नियम मागे घ्यावा.

**बंद असलेली गावे** : बाभुळगाव, सावर, आसेगाव देवी, दिघी (१ व २), राणी अमरावती, पहूर, दाभा, घारफळ, कोल्ही, कोपरा जानकर, गणोरी, नायगाव, मदनी, वेणी आणि वाटखेड.

**उपस्थित पदाधिकारी व व्यावसायिक** : निवेदन देताना बाभुळगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष अनिल खोडे, सचिव संतोष वर्मा, कोषाध्यक्ष मयूर पिसे, प्रसिद्धी प्रमुख रोहनीश फसाटे यांच्यासह संतोष गुप्ता, अक्षय महिंदे, पंकज महिंदे, शोएब शेख, अबरार शेख, नजरु काझी, सुरज बोंबले, सुनिल खोडे, मयुर डफले, योगेश्वर पिसे, सागर चिजकार, श्रीकांत डफळे, अभिनव धवस, सोएल शेख, निखील उमरतकर, शेहजाद खान, सुमित डंभारे, शेख युसुफ, अमोल राऊत आणि समिर पुनेवार हे पदाधिकारी व व्यावसायिक उपस्थित होते.

औषध विक्रेते म्हणाले, “आरोग्य क्षेत्रात अनधिकृत ऑनलाइन विक्री आणि बनावट औषधे ही जनतेसाठी मोठी समस्या बनली आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्याशिवाय आम्ही आंदोलन मागे घेणार नाही.”

# आर्ट ऑफ गिव्हिंगकडून रुग्णांना फळ वाटप

प्रतिनिधी २१ मे




**आर्णी** : सामाजिक बांधिलकी जपत बोरगाव येथील युवकांनी “आर्ट ऑफ गिव्हिंग” उपक्रमांतर्गत आर्णी येथील सरकारी रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळे तसेच थंड पेयांचे वाटप केले. उन्हाळ्याच्या तीव्र पार्श्वभूमीवर रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी युवकांनी रुग्णांची विचारपूस करत त्यांना फळे व थंड पेयांचे वितरण केले. तसेच शहरातील फुटपाथवर वास्तव्यास असलेल्या बेघर नागरिकांनाही मदतीचा हात देत फळे व थंड पेयांचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. या उपक्रमात पिंटूभाऊ राठोड, विनयभाऊ राठोड, विक्रम राठोड, सौरभ चव्हाण, रोहित चव्हाण, सत्यम राठोड, चेतन राठोड, कुणाल राठोड व शिवचरण राठोड यांनी सहभाग घेतला.

उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत असून, भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे युवकांनी सांगितले.

# मुस्लिमांवरील अत्याचार थांबवा

प्रतिनिधी २१ मे




**उमरखेड** : देशातील मुस्लिम समाजावर होणारे कथित अत्याचार थांबवून संविधानिक अधिकार आणि धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राखण्यात यावे, या मागणीसाठी राष्ट्रिय मुस्लिम मोर्चा व भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने ढानकी येथे संयुक्त निवेदन देण्यात आले. ढानकी पोलिस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपतींना हे निवेदन पाठविण्यात आले.

भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम, राष्ट्रिय मुस्लिम मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. सैय्यद मकसूद आणि राष्ट्रीय प्रभारी चांद मोहम्मद यांच्या आवाहनानुसार देशभरातील ३१ राज्ये, ६५० जिल्हे आणि ५ हजार तालुक्यांत एकाचवेळी आंदोलन करण्यात आले.

ढानकी येथे भारत मुक्ती मोर्चाचे अमोल पाटील, प्रकाश कांबळे तसेच राष्ट्रिय मुस्लिम मोर्चाचे शेख जब्बारभाई यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले.

धार्मिक स्वातंत्र्याच्या कलमांचे पालन, कथित गोतस्करीच्या नावाखाली होणारे अत्याचार थांबविणे, निरपराध मुस्लिम व ईसाई तरुणांची सुटका, जातीनिहाय जनगणना आणि विविध आयोगांच्या शिफारशी लागू करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मुजाहिदखान, शेख सफदर, इनायतभाई, पत्रकार शेख इरफान, शाहरुख शेख, मल्हारी दवणे, दिलीप कलाले, पुंडलिक तलवारे, कृष्णा पाटील चंद्रवंशी, मुनव्वरखान आदी उपस्थित होते.

# सत्यपाल महाराज यांनी दिला समाजप्रबोधनाचा संदेश



प्रतिनिधी २१ मे

**दिग्रस** : सुप्रसिद्ध सप्तखंजेरी वादक तथा समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी दिग्रस येथील आस्था झुणका भाकर केंद्राला सदिच्छा भेट देत समाजात सेवाभाव, बंधुभाव आणि मानवतेची जपणूक करण्याचा संदेश दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत समाजप्रबोधनाचे कार्य अधिक व्यापक करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

भेटीदरम्यान त्यांनी गरजू नागरिकांना अल्पदरात भोजन उपलब्ध करून देणाऱ्या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमा भेट देत सामाजिक जागृतीचा संदेश दिला. केंद्रात कार्यरत माता-भगिनींना साडी-चोळी भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी गजाननराव चिचोंळकर, राजेशभाऊ काईंगे, सुर्या पंडित तसेच रत्नपारखी व पंडित परिवार उपस्थित होते. महाराजांच्या भेटीमुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.

# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात आर्णीत शंभर टक्के बंद

प्रतिनिधी २१ मे




**आर्णी** : अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या आवाहनावरून ऑनलाईन बेकायदेशीर औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून वाढत असलेल्या व्यावसायिक स्पर्धेविरोधात मंगळवारी आर्णी शहरासह तालुक्यातील औषध विक्रेत्यांनी एकदिवसीय लाक्षणिक बंद पाळला. शहरातील सर्व औषध दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आल्याने बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मूकमोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्यातील औषध विक्रेते, औषधी पेढ्यांतील कर्मचारी तसेच ग्रामीण भागातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चा तहसील कार्यालयावर नेऊन तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

ऑनलाईन औषध विक्रीमुळे स्थानिक औषध विक्रेत्यांपुढे अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होत असून सरकारने अशा बेकायदेशीर विक्रीवर तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनात सावळी, लोनबेहळ, जवळा, लोणी बोरगाव, कोसदणी, शेलू आदी ग्रामीण भागातील औषध विक्रेते सहभागी झाले होते. यावेळी तालुका संघटनेचे पदाधिकारी, औषध विक्रेते आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संकटांच्या छायेत आयपीएलचा जल्लोष; युवक काँग्रेसचा केंद्र सरकारवर निशाणा

प्रतिनिधी २१ मे



**उमरखेड** : देशात महागाई, बेरोजगारी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत असताना आयपीएल स्पर्धेवर होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चाबाबत युवक काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. युवक काँग्रेसचे यवतमाळ जिल्हा महासचिव तथा पुसद, उमरखेड आणि महागाव विधानसभा प्रभारी सुजित विजय मानकामे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून केंद्र सरकारच्या प्राधान्यक्रमांवर टीका केली आहे.

मानकामे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या दरांमुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. बेरोजगारी वाढत असून अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत आयपीएल सामन्यांसाठी स्टेडियममधील हायमास्ट लाईट्स, वातानुकूलित व्यवस्था, जाहिराती आणि इतर सुविधांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असल्याची टीका त्यांनी केली.

आयपीएल सामन्यांदरम्यान हजारो वाहनांच्या वापरामुळे इंधनाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याचाही आरोप त्यांनी केला. “देश संकटात असताना मनोरंजनाला प्राधान्य द्यायचे की जनतेच्या मूलभूत प्रश्नांना?” असा सवाल उपस्थित करत सरकारने जनहित आणि संसाधनांच्या योग्य नियोजनाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

देशाची सुरक्षा, जनतेच्या गरजा आणि उपलब्ध संसाधनांचे नियोजन हे सरकारचे पहिले कर्तव्य असल्याचे सांगत नागरिकांनीही जागरूक राहून प्रश्न विचारण्याची गरज असल्याचे मानकामे यांनी नमूद केले.

# बाभुळगावात शेती संकट गंभीर; खर्च वाढ, सावकारी, वन्यप्राणी उपद्रवाने शेतकरी हैराण

प्रतिनिधी २१ मे

समिर शिंदे

**बाभुळगाव** : यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यात शेती व्यवसाय अक्षरशः टिकावाच्या प्रश्नावर आला आहे. इनपुट खर्चात सातत्याने होणारी वाढ, पाण्याची टंचाई, वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव आणि खासगी सावकारांच्या विळख्यामुळे अनेक शेतकऱ्यांना बैलजोड्या विकण्याची नामुष्की स्वीकारावी लागत असल्याचे स्थानिक सूत्रांनी सांगितले. जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर ही स्थिती अधिक चिंताजनक ठरत आहे.

तालुक्यातील ५० ते ६० टक्के शेतकऱ्यांनी गेल्या काही वर्षांत बैलजोड्या विकल्याची माहिती आहे. गोठे रिकामे होत असताना तरुण पिढी शहराकडे स्थलांतर करत आहे.

### वन्यप्राण्यांचा उपद्रव आणि कायद्याचे आव्हान

■ शेतात रक्त आणि घाम गाळून उभ्या केलेल्या पिकांवर रानडुकर, सांबर, पोपट आणि इतर वन्यप्राण्यांचा हल्ला होत असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले. वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे शेतकरी स्वतःच्या शेतात हतबल झाला आहे. नुकसान भरपाईची यंत्रणा अस्तित्वात असली तरी ती अपुरी आणि विलंबित असल्याचे तक्रारी आहेत.

शेती बटाईने देऊन पोट भरण्याची वेळ अनेकांवर आली आहे. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचा खर्च गगनाला भिडला असून, पिकांचे बाजारभाव आणि उत्पादन यात सातत्य नसल्याने नफा होत नसल्याचे शेतकरी सांगतात.

**कर्जबाजारीचे चित्र**

बँकांकडून संस्थात्मक कर्ज मिळणे कठीण झाल्याने तालुक्यातील ७० टक्क्यांहून अधिक शेतकरी खासगी सावकारांकडे वळले आहेत. अवैध सावकारीविरोधी कायदे असूनही अंमलबजावणी अपुरी राहिल्याने ही समस्या वाढत आहे. वाढलेले विजेचे दर आणि सिंचन सुविधांचा अभाव यामुळे शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून राहिली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात २०२६ मध्ये जानेवारी ते मे या कालावधीत १०२ शेतकरी आत्महत्येच्या घटना घडल्याची कार्यकर्ते किशोर तिवारी यांनी दिलेली माहिती आहे. पूर्वीही हा जिल्हा शेतकरी आत्महत्यांसाठी संवेदनशील राहिला आहे.

**सरकारचे प्रयत्न आणि अपेक्षा** : शासनाकडून सोलर पंप, पीक विमा आणि नुकसान भरपाईसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. बेम्बला प्रकल्पासारख्या सिंचन योजनांमधून काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार अंमलबजावणीतील कमतरता आणि तुटपुंजी मदत यामुळे संकट कमी होत नाही.

बाभुळगावसह संपूर्ण विदर्भात शेतीला सक्षम करण्यासाठी सिंचन विस्तार, वन्यप्राणी व्यवस्थापन, संस्थात्मक कर्ज सुविधा आणि पिक विविधीकरण यावर ठोस उपाययोजना करण्याची गरज शेतकरी संघटनांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने या संकटाकडे गांभीर्याने पाहून तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

# सर्वसामान्यांचे प्रेम हीच माझी ऊर्जा – राजेश आडे

### सेवानिवृत्तीनंतरही समाजसेवेसाठी आयुष्य समर्पित करण्याचा निर्धार

प्रतिनिधी २१ मे




**आर्णी** : “नोकरीच्या निमित्ताने गाव सोडावे लागले असले तरी गावाशी जुळलेली नाळ मी कधीही तुटू दिली नाही. आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांमुळे आम्ही चारही भाऊ उच्च पदांवर पोहोचलो. लोकसेवा हा आमच्या कुटुंबाचा मूलमंत्र असून, सेवानिवृत्तीनंतरही उर्वरित आयुष्य सर्वसामान्य आणि दुर्लक्षित घटकांच्या सेवेसाठी अर्पण करणार आहे. सर्वसामान्यांनी दिलेले प्रेम हीच माझी खरी ऊर्जा आहे,” असे भावनिक प्रतिपादन सेवानिवृत्त कामगार उपायुक्त राजेश आडे यांनी केले.

नजीकच्या खेड येथील रहिवासी असलेले राजेश आडे नुकतेच कामगार उपायुक्त पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त जवळा-लोणी सर्कल मित्र मंडळाच्या वतीने जवळा येथील सावित्रीबाई फुले सभागृहात भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना राजेश आडे यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. “माझ्या खेड गावात पहिल्यांदा एसटी बस आली तेव्हा मी आईला विचारले की ही बस कुणाची आहे? आईने सांगितले, ‘सरकारची आहे.’ त्यानंतर आकाशातून जाणारे विमान पाहूनही मी तोच प्रश्न विचारला आणि आईने पुन्हा ‘सरकारचे’ असे उत्तर दिले. शाळेत शिक्षकांनी मोठे होऊन काय बनायचे, असा प्रश्न विचारला असता मी ‘सरकार होणार’ असे उत्तर दिले होते. पुढे सरकारी यंत्रणेतील प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली,” असे त्यांनी सांगितले. “आता याच सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काम करण्याची इच्छा आहे,” असा मनोदयही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक हेमंतकुमार कांबळे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, “आज अनेक जण उच्च पदावर गेल्यानंतर आपल्या गावाकडे आणि माणसांकडे दुर्लक्ष करतात. मात्र राजेश आडे यांनी आपल्या मातीशी आणि परिसराशी असलेले नाते कायम जपले. सेवानिवृत्तीनंतरही समाजासाठी काम करण्याची त्यांची भावना ही खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आणि मानवतावादी आहे.” यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजेश श्रीवास, राजू आंबेकर, राजन भागवत, नंदू देशमुख, राजेश टाके, नर्सिंग चव्हाण, बिपिन राठोड, प्रल्हाद इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून राजेश आडे यांच्या प्रशासकीय कार्याचा व सामाजिक बांधिलकीचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिलक मांडवगडे यांनी केले. सूत्रसंचालन नरेश रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन अविनाश ढाकुलकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तिलक मांडवगडे, नरेश रामटेके, नंदू देशमुख, भारत भैस, मनोज चांडक, विजय सोळंके, रमेश कोरटकर, गणेश एकंडवार, बाबाराव खोडनकर, आशिष राठोड, गोपाल कोटमकर, सचिन धाये, संतोष जयस्वाल, अमित रामटेके, अनिल चौधरी, गणेश धनोडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. २१ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


# पुढील दोन तीन अत्यंत धोकादायक!

**प्रा. अनिल म बंड यांचा अंदाज**

**अमरावती :** सध्या मध्य भारत उत्तर प्रदेश गुजरात राजस्थान दिल्ली पंजाब हरियाणा या प्रदेशावर पाऊस पडण्यासाठी आवश्यक हवामानशास्त्रिय नसल्याने या संपूर्ण भागात कोरडे वातावरण राहण्याची शक्यता आहे. तसेच राजस्थान कडुन विदर्भाकडे कोरडे आणि उष्ण वारे वाहत असल्याने पुढील सात दिवस विदर्भात आणि प्रामुख्याने अमरावती अकोला वर्धा यवतमाळ जिल्ह्यात तीव्र उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने २०,२१ मे अमरावती अकोला वर्धा जिल्ह्यात रेड अलर्ट जाहीर केलेला आहे. त्यामुळे नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की ११ ते ०६ या कालावधीत अजिबात घराच्या बाहेर पडु नये. या जिल्ह्यात कमाल तापमान आज उद्या ४७ डीग्री पार करू शकते. उर्वरित विदर्भात सुद्धा तापमान ४५ अंशाच्या आसपास राहिल. तसेच २२,२३ मे ऑरेंज अलर्ट आहे. विदर्भात पुर्व मानसुनचा पाऊस २५ तारखेनंतरच येण्याची शक्यता आहे.

# मुंबईच्या धर्तीवर अमरावतीत कोंडेश्वर फिशरीज हब विकसित होणार

**◆ महसूल मंत्री व मत्स्यव्यवासाय मंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. रवि राणा यांच्या पुढाकारातून चिखलदरा स्कायवॉक, बेलोरा विमानतळ येथील नाईट फ्लाईट उड्डाण**

प्रतिनिधी २१ मे



**अमरावती:** अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती व आमदार रवि राणा यांच्या पुढाकारातून अमरावती शहरातील कोंडेश्वर फिशरीज हब संदर्भात महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक मंत्रालयमध्ये आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये कोंडेश्वर फिशरीज हब हे मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यात यावे, यासाठी सक्षम व व्यावसायिक संस्था अथवा एजन्सीची निवड करून प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. मत्स्यव्यवसाय क्षेत्राला चालना देण्यासोबतच स्थानिक रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला गती देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी अमरावती जिल्ह्यातील विविध विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. विशेषतः चिखलदरा येथे प्रस्तावित स्कायवॉक प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करून पर्यटन विकासाला चालना देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच अमरावती विमानतळावरील नाईट व्हिजन सुविधांचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सकाळी व रात्री विमान सेवा सुरू करण्यासंदर्भातही सकारात्मक चर्चा झाली.

बैठकीत पायलट ट्रेनिंग स्कूल, स्टेक्स स्टाईल पार्क तसेच आयटी पार्क प्रकल्पांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीस गती देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश यावेळी महसूल मंत्री व पालकमंत्री यांचे कडून उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

धर्तीवर अमरावतीत कोंडेश्वर फिशरीज हबविकसित होणारं; महसूल मंत्री व मत्स्यव्यवासाय मंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. रवि राणा यांच्या पुढाकारातून चिखलदरा स्कायवॉक, बेलोरा विमानतळ येथील नाईट फ्लाईट उड्डाण, अमरावती एम आय डी सी आयटी पार्कसह विविध विकास प्रकल्पांना गती देण्यात आली.

आ. रवी राणा यांनी महसूल मंत्री यांचे लक्ष केंद्रित करत अचलपूर अपर जिल्हाधिकारी कार्यालय उघडणार, अमरावती शहर व ग्रामीण तहसील विभाजन होऊन कार्यान्वित होणारं, चूरणी तहसील कार्यालय सुरू होणारं. आदी कामांची मंजुरी वरील बैठकीत करून घेतली असल्याचे सांगण्यात आले.

या बैठकीस डॉ. रामास्वामी, सचिव प.दु.म., श्रीमती देशभ्रतार मॅडम, आयुक्त मत्स्यव्यवसाय, श्री प्रकाश खपले, व्यवस्थापकीय संचालक, एमएफडीसी, तसेच प्रवीण महाजन, खाजगी सचिव उपस्थित होते.

# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी मतदान उपविभागीय स्तरावर होणार

**राजकीय पक्षांच्या बैठकीत जिल्हाधिकारी यांची माहिती**

प्रतिनिधी २१ मे

**अमरावती:** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर केली आहे. या निवडणूकीसाठी उपविभागीय अधिकारीस्तरावर मतदान होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणूक निमित्ताने जिल्हाधिकारी येरेकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबतच बैठक घेतली. बैठकीसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे उपस्थित होते.

बैठकीत स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी जाहीर करण्यात आलेला कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. तसेच निवडणूक काळात आदर्श आचारसंहिता राहणार असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उमेदवार, प्रचार करणारे व्यक्ती आणि निवडणुकीशी संबंधितांसाठी मार्गदर्शक सूचना आहेत, त्यानुसार कारवाई होणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. मंत्री आणि लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वाहनाचा वापर किंवा प्रचारासाठी नियम ठरवून देण्यात आले आहे. तसेच प्रचार साहित्य तपासून देण्यासाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती नेमण्यात आली असल्याचे सांगितले.

राजकीय पक्षांना मतदारांची ड्राफ्ट यादी देण्यात येणार असून यावर काही हरकती असल्यास त्या नोंदविण्यात याव्यात. सात दिवसानंतर या याद्यांना अंतिम स्वरूप देण्यात येणार असून याद्या मतदानकेंद्रनिहाय पुरविण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिली. बैठकीला राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# दर्यापूरच्या विकासासाठी शहराध्यक्ष मृणाल पाटील इंगळे सरसावले

**◆ क्रीडा सुविधा आणि पुतळ्यांसाठी विशेष निधीची मागणी!**

प्रतिनिधी २१ मे



**दर्यापूर:** शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष मृणाल पाटील इंगळे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री यांना दोन स्वतंत्र निवेदनांद्वारे दर्यापूरच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या:** अद्ययावत क्रीडा संकुल: दर्यापूर येथील क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचे इंडोर बॅडमिंटन कोर्ट, सुसज्ज जलतरण तलाव (Swimming Pooled) आणि गरजू खेळाडूंना मोफत क्रीडा साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी विशेष निधीची मागणी करण्यात आली आहे.

**महापुरुषांचे भव्य पुतळे:** शहरातील अस्मितेचा विषय असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्यांच्या उभारणीसाठी, चौथरा निर्माण आणि परिसर सुशोभीकरणासाठी तातडीने प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यासाठी जागा आधीच उपलब्ध असून केवळ निधीअभावी हे काम थांबले आहे.

दर्यापूरच्या युवा पिढीला व्यासपीठ मिळावे आणि शहराच्या वैभवात भर पडावी, यासाठी हे दोन्ही विषय अत्यंत महत्त्वाचे असून पालकमंत्र्यांनी यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती मृणाल पाटील इंगळे यांनी केली आहे.

# देशव्यापी औषध विक्रेत्यांचा बंद

**◆ ई-फार्मसीच्या बेकायदेशीर कारभाराविरोधात केमिस्ट संघटना आक्रमक**

प्रतिनिधी २१ मे



**अमरावती :** २० मे – देशभरातील औषध विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी तसेच सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आज बुधवार दि. २० मे रोजी देशव्यापी एक दिवसीय बंद पुकारण्यात आला आहे. ही माहिती Amravatied District Chemi&st Druggist Asociation यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून समोर आली.

संघटनेचे अध्यक्ष Saurabhed T. Malani, सचिव Raja S. Nanwani तसेच उपाध्यक्ष Manoj Ved. Daphale यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशभरातील सुमारे १२.४० लाख औषध विक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांनी अनेकदा शासनाकडे मागण्या मांडूनही अद्याप तोडगा निघालेला नाही.

**ई-फार्मसीमुळे सार्वजनिक आरोग्यास धोका**

संघटनेच्या म्हणण्यानुसार, अनियंत्रित ई-फार्मसीमुळे औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० तसेच संबंधित नियमांचे गंभीर उल्लंघन होत आहे. योग्य डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री, बनावट प्रिस्क्रिप्शनचा वापर, अँटीबायोटिक्स व व्यसनकारक औषधांची सहज उपलब्धता, तसेच ँघ्-निर्मित प्रिस्क्रिप्शनवर औषधे विकली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

फार्मासिस्ट आणि रुग्ण यांच्यातील थेट संवाद कमी होत असल्याने चुकीच्या औषध वापराचा धोका वाढत असल्याचेही संघटनेने नमूद केले आहे. यामुळे अँटी-मायक्रोबियल रेझिस्टन्स (AMR) वाढीस लागण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**कार्पोरेट कंपन्यांच्या 'डीप डिस्काउंटिंग' विरोधात संताप**

मोठ्या कार्पोरेट कंपन्या आकर्षक सवलती देऊन लहान व मध्यम औषध विक्रेत्यांना बाजारातून बाहेर ढकलत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. ब्रिक अँड मॉर्टरङ्ग केमिस्ट दुकाने ही ग्रामीण व निमशहरी भागातील आरोग्य व्यवस्थेचा कणा असून त्यांचे अस्तित्व धोक्यात आल्यास सर्वसामान्य नागरिकांच्या औषध उपलब्धतेवर परिणाम होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

**कोविड काळातील अधिसूचना मागे घेण्याची मागणी**

संघटनेने केंद्र सरकारकडे दि. २६ मार्च २०२० रोजी जारी करण्यात आलेली GSR 220(E) अधिसूचना तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. कोविड-१९ आपत्कालीन परिस्थितीत जारी झालेल्या या अधिसूचनेचा डिजिटल प्लॅटफॉर्मकडून गैरवापर होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मूळ प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री व अनिवार्य नोंदी न ठेवण्यास या शिथिलतेमुळे खतपाणी मिळत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

# १४.६६ कोटीची रक्कम मजिप्राच्या एसबीआय खात्यात जमा

**◆ आ. संजय खोडके यांच्या प्रयत्नाने मजीप्रा कंत्राटदारांना मोठा दिलासा**

प्रतिनिधी २१ मे



**अमरावती:** जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने मागील वर्षभरापासून रखडलेल्या कामांच्या देयकांसाठी अखेर १४ कोटी ६६ लाखांची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीच्या एसबीआय बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. या बाबत महाराष्ट्र विधान परिषद आमदार संजय खोडके यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असल्याने मजीप्रा कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने मागील वर्ष २०२५-२०२६ च्या १५.३१ कोटींची देयके मागील वर्षभरापासून रखडली असल्याने कंत्राटदारांनी मजीप्रा कार्यालयावर आंदोलन पुकारले होते. सतत आठवडाभर आंदोलन करण्यात आल्याने मजीप्राची कामे प्रभावित होऊन अमरावती शहरातील पाणी पुरवठा सुद्धा विस्कळीत होण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान गेल्या १४ मे रोजी महाराष्ट्र विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी मजीप्रा कंत्राटदारांच्या काम बंद आंदोलनाला भेट देऊन त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. जिल्ह्यातील कंत्राटदारांनी केलेल्या कामांचे मोबदले गेल्या एक वर्षापासून शासनाकडे थकीत होते. वारंवार पाठपुरावा करूनही तोडगा निघत नसल्याने कंत्राटदार बांधवांनी आक्रमक पवित्रा घेत संपाचे हत्यार उपसले होते. 'आम्ही केलेल्या कामाचे हक्काचे पैसे आम्हाला मिळावेत' आणि 'प्रलंबित देयकांशिवाय नवीन काम करणार नाही' अशी ठाम भूमिका संघटनेने मांडली होती. या गंभीर पेचप्रसंगात महाराष्ट्र विधान परिषद सदस्य - संजय खोडके यांनी लक्ष घालून कंत्राटदारांच्या मागण्या लवकरच मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले. त्यांच्या प्रभावी मध्यस्थीमुळे मजीप्रा कंत्राटदारांनीं आपले आंदोलन स्थगित करत असल्याचे जाहीर केले. दरम्यान आ.संजय खोडके यांनी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला असता प्रशासकीय हालचालींना वेग आला असल्याने अशातच आता मजीप्रा कंत्राटदारांची वर्षभरापासूनची थकीत देयके अदा करण्यासाठी १४.६६ कोटीची रक्कम मजीप्राच्या एसीबीआय खात्यात जमा करण्यात आली आहे. या संदर्भात आ.संजय खोडके यांच्या प्रयत्नाने मजीप्रा कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# शहरातील अवैधरित्या चालणाऱ्या वरली मटका धंद्यावर धडक कारवाई

प्रतिनिधी २१ मे



**अमरावती :** पोलीस आयुक्त यांनी अवैध्यधंदयाना आळा बसावा याकरीता आदेश दिलेवरून आज दिनांक १९/०५/२०२६ रोजी गुन्हे शाखा यांनी गुप्त माहीतीवरून आयुक्तालय हददीमधील एकुण ०७ अवैध्द धंदयावर रेड करून वरली मटक्याचा अवैध्यधंदा करणा-या ०८ इसमांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून वरली मटका साहीत्य व नगदी असे एकूण १०,०४०/- रू चा मुददेमाल ताब्यात घेतला.

पो.स्टे. बडनेरा हदीदीत वरूडा पुलाखाली सार्वजनिक ठिकाणी जुगार रेड करून आरोपी क्रमांक गौतम चक्रधर चिंचखेडे, वय ४५ वर्ष, रा. सारशी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती, फरार अरोपी अमीत यादव, रा. बडनेरा यांचे ताब्यातून १,३६०/- रू चे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. बडनेरा येथे कलम १२ (अ) म.जु.का. सहकलम ४९ भा. न्या. स. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पो.स्टे. बडनेरा हदीदीत वरूडा पुलाखाली सार्वजनिक ठिकाणी जुगार रेड करून आरोपी क्रमांक राजेश गुलाबराव भालेकर, वय ४५ वर्ष, रा. सारशी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती याचे ताब्यातून १,१६०/- रू चे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. बडेनरा येथे कलम १२(अ) म.जु.का. सहकलम ४९ भा. न्या.स. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पो.स्टे. फ्रेजरपुरा हदीदीत शुक्रवार बाजार येथील सार्वजनिक ठिकाणी येथे जुगार रेड करून आरोपी क्रमांक शेखर संजय गडलिंग, वय २८ वर्ष, रा. राहुल नगर, अमरावती यांचे ताब्यातून १,५१०/- रू चे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. फेजरपुरा येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पो.स्टे. फेजरपुरा हदीदीत शुक्रवार बाजार येथील सार्वजनिक ठिकाणी येथे जुगार रेड करून आरोपी क्रमांक अर्जुन चंद्रपाल पांडे, वय ३२ वर्ष, रा. वडाळी, अमरावती यांचे ताब्यातून १,२१०/- रू चे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पो.स्टे. नागपुरी गेट हदीदीत कमेला ग्राउड येथील सार्वजनिक ठिकाणी येथे जुगार रेड करून आरोपी कमांक शेख नईम शेख फईक, वय ४० वर्ष, रा. अकबर नगर, अमरावती यांचे ताब्यातून १,३१०/- रू वे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. नागपुरी गेट येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पो.स्टे. नागपुरी गेट हदीदीत पठाण चौक येथील सार्वजनिक ठिकाणी येथे जुगार रेड करून आरोपी क्रमांक मोहम्मद सलीम मोहम्मद हनीफ, वय ५३ वर्ष, रा. सागर नगर, अमरावती यांचे ताब्यातून २,५१०/- रू चे जुगार साहीत्य जप्त करून त्यांचे विरुध्द पो.स्टे. नागपुरी गेट येथे कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी १८ जून रोजी मतदान

**◆ जिल्ह्यात आचारसंहिता लागू**

प्रतिनिधी २१ मे

**अमरावती:** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात अमरावतीचा समावेश असल्याने मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तातडीने लागू करण्यात आली आहे.

अमरावती जिल्ह्यामध्ये स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार, सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करणे, १ जून रोजी नामांकने (उमेदवारी अर्ज) दाखल करण्याची अंतिम तारीख, २ जून रोजी नामांकनांची छाननी, ४ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान, २२ जून रोजी मतमोजणी, २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख आहे.

# पथ दिव्यांच्या नियंत्रणासाठी महावितरण अमरावती परिमंडळाचे महत्त्वपूर्ण पाऊल

**◆ दिवसा सुरू राहणारे पथदिवे होणार बंद, वीजबिलातही होणार बचत**

प्रतिनिधी २१ मे

**अमरावती:** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील पथदिव्यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी महावितरणच्या अमरावती परिमंडळाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. स्मार्ट मीटरच्या स्मार्ट वापरातून पथदिव्यांचे स्वयंचलित नियंत्रण होणार असून, त्यामुळे दिवसा अनावश्यक सुरू राहणारे पथदिवे बंद ठेवणे शक्य होणार आहे. परिणामी वीज बचतीसोबतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीजबिलातही लक्षणीय बचत होणार आहे.

महावितरण अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विविध कार्यालयांसोबत पाठपुरावा करून देखील अनेक ठिकाणी पथदिवे दिवसा सुरू राहत असल्याचे दिसून येते. त्यामुळे गरज नसतांना मोठ्या प्रमाणावर वीज वाया जाते, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज खर्चात अनावश्यक वाढ होते आणि वीजबिलाच्या वसूलीतही मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण होतात.

ही बाब लक्षात घेऊन स्मार्ट मीटरच्या तंत्रज्ञानाचा वापर करून पथदिवे निश्चित वेळेनुसार म्हणजेच सूर्यास्तानंतर संध्याकाळी ६ वाजता पथदिवे सुरू होणे आणि सूर्योदयानंतर सकाळी ६ वाजता ते आपोआप बंद होणे यासाठी तांत्रिक प्रोग्रॅम निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय पथदिव्यांचे स्वंयचलित अचूक नियंत्रण शक्य होणार आहे.

अमरावती परिमंडळाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत महानगरपालीका, नगरपालीका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायत अंतर्गत ४ हजार १८५ पथ दिव्यांच्या जोडण्यांना स्मार्ट मीटर लावण्यात आले आहे. यात अमरावती जिल्ह्यातील २ हजार २०३ जोडण्या आहेत आणि यवतमाळ जिल्ह्यात १ हजार ९७२ ठिकाणी स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत. पथ दिव्यांसाठी अनाधिकृत वीज पुरवठा घेण्यात आला असेल, तसेच दिवसा सुरू असणाऱ्या पथ दिव्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि २१ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## रिसोड बाजार समितीचा कारभार पुन्हा चव्हाट्यावर...

# मूलभूत सुविधा कोमात, अवैध कामे जोमात !

## डॉ. चंद्रशेखर देशमुख यांची पत्रकार परिषद गाजली

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील रिसोड कृषी उत्पन्न बाजार समिती एक सधन बाजार समिती म्हणून ओळखली जाते. परंतु गेल्या काही वर्षांपासून सदर बाजार समितीचा कारभार या ना त्या कारणाने पुन्हा पुन्हा चव्हाट्यावर येत आहे. मूलभूत सोई - सुविधा कोमात असतांनाच अवैध बांधकामांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बाजार समितीचे मा. संचालक डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी नुकतीच एक पत्रकार परिषद घेऊन बाजार समितीने केलेल्या नियमबाह्य कामांचा गौप्यस्फोट केला आहे.

शेतकऱ्यांसाठी उभी केलेल्या रिसोड बाजार समितीचा कारभार दिवसागणिक ढेपाळत चालला असल्याचे बोलले जात असून एकतर्फी व मनमानी कारभारामुळे प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार





बोकाळला असल्याचे दिसून येत आहे. परिणामी शेतकऱ्यांसह, व्यापारी आणि गाळेधारक अनेक समस्यांनी ग्रासले आहेत. या गंभीर प्रकरणाला आळा बसावा म्हणून उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एक महत्वपूर्ण याचिका दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायालयाने काही निर्देश दिले होते. मात्र बाजार समितीच्या सूत्रधारांनी न्यायालयाचे आदेश न जुमानता आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. यात प्रामुख्याने बाजार समितीने स्थानिक नियोजन प्राधिकरणाला अंधारात ठेवून शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचा आरोप डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. परिणामी विनापरवानगी आणि नियमबाह्य केलेल्या कामांचा वाद आता चांगलाच चिघळला आहे. बाजार समितीने उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्याचा ठपका ठेवत अवमान याचिका १७४/२०२६ दाखल करण्यात आली आहे. सदर याचिकेची गांभीर्याने दाखल घेत माननीय न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि माननीय न्यायमूर्ती रजनीश आर. व्यास यांच्या खंडपीठाने संबंधितांना कारणे


मंगळवार दि १९ मे २०२६ सिटी न्यूज वाशीम वाशीम Express

रिसोड बाजार समितीचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात...

अवैध बांधकामाचा कारनामा, न्यायालयात होणार पंचनामा!

अवैध बांधकाम भोवणार, कारवाईची टांगती तलवार, डॉ. देशमुख यांचा पत्रकार परिषदेत 'वार'

दाखवा नोटीस बजावली आहे. या प्रकरणी पुढील अंतिम सुनावणी येत्या ११ जून २०२६ रोजी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. न्यायालयाच्या या कडक भूमिकेमुळे बाजार समितीच्या गोटात खळबळ तर उडालीच आहे, सोबतच जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे. परिणामी डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी घेतलेली पत्रकार परिषद चांगलीच गाजली असल्याची सुद्धा चर्चा जिल्हाभर होत आहे.

---

बातम्या खास, सिटीन्यूज सुपरफास्ट, दखल हमखास...

## सुरू झाले कारवाईचे सत्र, अखेर सरपंच अपात्र!




● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

**तालुक्यातील वरूड तोफा गट ग्राम पंचायतचे सरपंच सौ. मंगला गौतम वानखेडे यांना अखेर जिल्हाप्रशासनाने अपात्र ठरवले आहे. कोयाळी खुर्द, वरूड तोफा गट ग्राम पंचायतचे सरपंच मनमानी कारभार करत असल्याबाबत सिटीन्यूज सुपरफास्टने अनेक वेळा पाठपुरावा केला होता. सदर वृत्ताची दखल घेत अखेर जिल्हाधिकारी कार्यालयाने एक महत्वपूर्ण निर्णय घेत ग्रामसभा नियमित न घेतल्याने सरपंच वानखेडे यांना अपात्र ठरवले आहे. परिणामी तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.**


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सरपंच पदाचा गैरवापर, शासकीय निधीत अफरातफर!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील वरूड तोफा व कोयाळी खुर्द गट ग्राम पंचायतचे सरपंच यांनी ग्राम पंचायत सचिव यांच्याशी संगनमत करून शासकीय निधीत अफरातफर करत मोठा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा आरोप करण्यात आला असून या धक्कादायक प्रकरणामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. या बाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र चौकशी अहवालास जाणीवपूर्वक ... नावावरून शासकीय निधी काढल्याचा आरोप करण्यात आला आहे. व घरच्याच नातेवाईक काला घरकुल योजनेचा लाभ दिल्याचा आरोपही सिद्ध आहे विशेष म्हणजे, चौकशीदरम्यान संबंधित ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक नोंदी (रेकॉर्ड) उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बनावट

रिसोड तालुक्यातील गट ग्रामपंचायत कोयाळी खुर्द-वरुड तोफा येथील सरपंच सौ. मंगला गौतम वानखडे यांना ग्रामसभा नियमित न घेतल्याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने अपात्र ठरविण्याचा महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.तक्रारदार तथा ग्रामपंचायत सदस्य प्रवीण विश्वनाथ वानखडे यांनी ग्रामसभांच्या आयोजनात गंभीर अनियमितता झाल्याची तक्रार संबंधित प्रशासनाकडे केली होती. चौकशीदरम्यान ग्रामसभा नियमानुसार न घेणे, बैठकींच्या नोंदी व प्रक्रियेमध्ये त्रुटी आढळून आल्याचे नमूद करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार ग्रामपंचायत प्रशासनातील पारदर्शकता व लोकशाही प्रक्रिया टिकविण्यासाठी ग्रामसभा घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच ग्रामस्थांच्या सहभागाशिवाय ग्रामपंचायत कारभार चालविणे कायद्याच्या विरोधात असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले.या निर्णयामुळे तालुक्यातील ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली असून, ग्रामपंचायत स्तरावरील कामकाजात नियमांचे पालन करण्याबाबत प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून, ग्रामपंचायत कारभारात पारदर्शकता आणण्याची मागणी जोर धरत आहे.

---

## थोडक्यात

### पोक्सो व अपहरणाच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीस जामीन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

आशेगाव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका खळबळजनक अपहरण आणि पोक्सो (POCSO) गुन्ह्यातील आरोपीला मंगरुळपीर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा दिलासा देत जामीन मंजूर केला आहे. बचाव पक्षाचे वकील ॲड. जयश बाळासाहेब ठाकरे, ॲड. शुभम किशोर करडीले आणि ॲड. महेंद्र तुळशीराम सोलंके यांनी न्यायालयात मांडलेला तडाखेबंद कायदेशीर युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.

प्रकरणाची पार्श्वभूमी: या प्रकरणातील फिर्यादी यांनी दिनांक ८ मार्च २०२६ रोजी आशेगाव पोलीस ठाण्यात त्यांची मुलगी बेपत्ता असून शेजाऱ्याने तिचे अपहरण केल्याची तक्रार दिली होती. पोलिसांनी सुरुवातीला ॅन्ए कलम १३७(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला होता. त्यानंतर २९ एप्रिल २०२६ रोजी आरोपीला नागपूर येथून अटक करण्यात आली व गुन्ह्यात ॅन्ए चे वाढीव कलम ८७, ६४(श) आणि पोक्सो कायद्याचे कलम ४ व ८ वाढवण्यात आले होते. यामुळे या प्रकरणाला गंभीर वळण आले होते.न्यायालयातील प्रभावी युक्तिवाद: आरोपीतर्फे विधीज्ञ ॲड. जयश बाळासाहेब ठाकरे, ॲड. शुभम किशोर करडीले आणि ॲड. महेंद्र तुळशीराम सोलंके यांनी मंगरुळपीर न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. सुनावणी दरम्यान तिन्ही विधीज्ञांनी न्यायालयासमोर घटनेची वस्तुस्थिती मांडली.तसेच उच्च न्यायालयाचे विविध न्यायनिवाडे आणि तपास यंत्रणेतील त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या गेल्या. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, मंगरुळपीर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने, दिनांक १९ मे २०२६ रोजी आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. या यशस्वी कामगिरीबद्दल विधी क्षेत्रात तिन्ही वकिलांचे विशेष कौतुक होत आहे.

### महिला व बालकांच्या संरक्षणाची अमलबजावणी करा -जिल्हाधिकारी

**वाशीम :** जिल्ह्यात महिला व बालकांच्या संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. महिलांवरील अत्याचार, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार तसेच बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये अत्यंत संवेदनशीलतेने व तत्परतेने कार्यवाही करण्यात यावी.

---

## केमिस्टच्या बंदची चर्चा, मूक मोर्चा !

### *जिल्ह्यात बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद
### *संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना (AIOCD) तसेच महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन (MSCDA) यांच्या वतीने, AIOCD ke MSCDA चे अध्यक्ष जगन्नाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुकारण्यात आलेल्या देशव्यापी केमिस्ट बंदला वाशिम जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील औषध विक्रेते, पदाधिकारी व केमिस्ट बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आंदोलनाला यशस्वी केले. जिल्ह्यातील सर्व मेडिकल बंद असल्यामुळे एकच चर्चा होती.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट






असोसिएशनच्या वतीने सर्वप्रथम जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. ऑनलाईन औषध विक्रीमुळे निर्माण होणारे संभाव्य धोके, औषध वितरण प्रक्रियेतील नियमांचे उल्लंघन, बनावट औषधांचा वाढता धोका तसेच सर्वसामान्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती जिल्हाधिकारी यांना देण्यात आली. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात आयोजित सभेमध्ये वाशिम डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा अमरावती झोनचे उपाध्यक्ष मा. श्री राजेश पाटील शिरसाट यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपाध्यक्ष जय ठाकरे, सचिव नंदकिशोर झंवर, सहसचिव नंदकिशोर अग्रवाल, सहसचिव हरीश लाहोटी, कोषाध्यक्ष प्रमोद देशमुख, सहसचिव प्रदीपजी नागे, वाशिम नगर परिषदेचे नगरसेवक राजूभाऊ वानखेडे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. मयुरी वाट मॅडम, एम.आर. असोसिएशनचे प्रतिनिधी नारायण गाभणे, अनसिंग शहराध्यक्ष अमोल उरकट, हरिभाऊ मोरे, करंडे मामा तसेच अनसिंग शहरचे जिल्हा ई.सी. सदस्य मनीष सारडा यांनीही मनोगत व्यक्त केले.

वक्त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ऑनलाईन औषधांची बिनधास्त विक्री भविष्यात गंभीर आरोग्यविषयक समस्या निर्माण करू शकते. डॉक्टरांच्या सल्ल्याविना औषधे सहज उपलब्ध होणे, औषधांच्या गुणवत्तेवर प्रश्न निर्माण होणे आणि बनावट औषधांचा धोका वाढणे ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. हा बंद रुग्णांना त्रास देण्यासाठी नसून शासनाचे लक्ष या गंभीर विषयाकडे वेधण्यासाठी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच तातडीच्या रुग्णांसाठी आवश्यक औषध सुविधा उपलब्ध ठेवण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. वाशिम तालुक्यात सकाळी १० वाजता स्थानिक केमिस्ट भवन येथून मूक मोर्चास सुरुवात करण्यात आली. हा मोर्चा पाटणी चौक, अकोला नाका मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आला. मोर्चामध्ये शेकडो केमिस्ट बांधवांनी शांततेत सहभाग घेत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून मोर्चाची सांगता करण्यात आली. याचप्रमाणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून संबंधित तहसीलदारांना निवेदने देण्यात आली. आंदोलनात तालुका अध्यक्ष आनंद टांक, तालुका सचिव कृष्णा चौधरी, तालुका कोषाध्यक्ष बद्रीनाथ मानधने यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## काँग्रेसची जिल्हाध्यक्षांची नवी यादी जाहीर.. वाशिम जिल्हाध्यक्षपदी राजुभाऊ चौधरी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशिम ●

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने महाराष्ट्रातील जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांची नवी यादी जाहीर केली आहे. 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत करण्यात आलेल्या या नियुक्त्यांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.



वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी विठ्ठल उर्फ राजुभाऊ पांडुरंग चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना मजबूत करण्याची जबाबदारी आता त्यांच्यावर असणार आहे. माजी जी.प. सदस्य,, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक कृषीउत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेभाऊ चौधरी यांनी यापूर्वी सहकार व राजकीय क्षेत्रात आपली उत्कृष्ट कामगिरी केली आहे. राजकारणात त्यांची चांगली पकड असून आजही ग्रामीण भागात त्यांचा धबधबा कायम आहे. विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, बुलढाणा, गडचिरोली आदी जिल्ह्यांमध्येही नव्या अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, जालना, परभणी, बीड, धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यांमध्येही काँग्रेसने नवे चेहरे पुढे आणले आहेत. काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. जिल्हानिहाय आढावा आणि वरिष्ठ नेत्यांशी चर्चेनंतरच अंतिम नियुक्त्यांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.

---

## १६.३० लाखाच्या घरफोडीचा छडा... पोलिसांनी आरोपीला शिकविला धडा !

### मेमन कॉलनी येथे धाडसी चोरी करणारा अब्दुल नौशाद अब्दुल जलील गजाआड

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहरात मेमन कॉलनी येथे ३ मे रोजी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी जमीन रहीम शेख वय ५८ वर्ष यांच्या घरात रात्री ४ वाजताच्या सुमारास एका अज्ञात चोराने घरातील सोन्याचे दागिने व ६० हजार रुपये रोख असा एकूण १७ लाख ३० हजाराचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली होती.तेव्हा ही चोरी करणाऱ्या अब्दुल नौशाद अब्दुल जलील या चोरास कारंजा पोलिसांनी



सापळा रचून गजाआड केले आहे.

सदर गुन्ह्याचे तपासात पो.नि. दिनेशचंद्र शुक्ला साहेब यांचे मार्गदर्शनात व पोहवा उमेशकुमार बिबेकर व पोका मोहम्मद परसुमाले यांचे गोपनिय बातमीचे आधारे सपोनी जयदीप पवार पोलीस हवालदार उमेशकुमार बिबेकर, अजय धनकर व पोलीस अमंलदार महम्मद परसुवाले यांनी सापळा रचुन आरोपी नामे अब्दुल नौशाद अब्दुल जलील वय २० वर्ष रा. कारंजा लाड याला मंगरुळपिर पो.स्टे.चे हद्दीत ताब्यात घेण्यात आले सदर गुन्ह्याचा तपास मा.पोलीस अधीक्षक निकेष खाटमोडे, अप्पर पोलीस अधीक्षक लता फळ, उपविभागीय पोलीस अधीकारी विषाल क्षिरसागर साहेब, पोलीस निरीक्षक दिनेशचंद्र शुक्ला यांचे मार्गदर्शनात सपोनी जयदीप पवार, पोहवा उमेशकुमार बिबेकर, अजय धनकर, मयुरेश तिवारी, गणेश जाधव, पोलीस कॉन्स्टेबल महम्मद परसुवाले, अमित भगत, नितीन पाटील, अनिस निनसुरवाले चालक नरेंद्र खाडे यांनि केला आहे. पुढील सपोनी जयदीप पवार हे करित आहे.

---

## लग्नावरून परतताना काळाचा घाला; एक जागीच ठार, दुसरा गंभीर!

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गावरील शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपरी सरहद्द येथे मंगळवार, २० मे रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास दुचाकी आणि पिकअप वाहनामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा युवक गंभीर जखमी झाला आहे. मृत व जखमी दोघेही मालेगाव तालुक्यातील तिवळी येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

मृत युवकाचे नाव राधेश्याम वामन इंगळे (वय ४२) असे असून, संतोष शिंदे



(वय ४०) हे गंभीर जखमी झाले आहेत. दोघेही मेहकर तालुक्यातील नागापूर येथे लग्न समारंभासाठी गेले होते. तेथून परत येत असताना पिंपरी सरहद्द येथे त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच ३७ यू ७०३१ ला भरधाव पिकअप वाहनाने जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, राधेश्याम इंगळे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर संतोष शिंदे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर पिकअप चालकाने वाहनासह घटनास्थळावरून पळ काढला.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला. मात्र अर्धा ते पाऊण तास उलटूनही रुग्णवाहिका घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. अखेर केनवड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची १०२ रुग्णवाहिका बोलावण्यात आली. १०२ रुग्णवाहिकेचे चालक तोफिक मिर्झा यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी युवकाला उपचारासाठी वाशिम येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.दरम्यान, अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. माहिती मिळताच शिरपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, फरार पिकअप चालकाचा शोध सुरू आहे.

---

## अधिकाऱ्याचे मनोमिलन, कायद्याचे उल्लंघन!



### * दारूमुळे हारू, सकाळी ६ पासून दुकान सुरू
### *अधिकारी येतात फक्त हप्ते वसुलीसाठी

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहरामध्ये नियमाचे उल्लंघन करून वेळेचे बंधन न पाळता वाईन शॉप, बियर बार, बिअर शॉपी व देशी दारूचे दुकान नियम धाब्यावर ठेवून खुलेआम सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू असून या सर्व दुकानांमधून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री जात आहे.तसेच बंदच्या दिवशी (ड्राय-डे) सुद्धा मागच्या रस्त्याने दारू विकल्या जात आहे.यावर कोणतीही कारवाई न करता दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क मंगरूळपीर अधिकारी हे फक्त हप्ते वसुली करण्याकरीताच कारंजा शहरात येतात.

यसविस्तर माहिती अशी की कारंजा शहरांमध्ये (१) सीएल-३ दुकानाची संख्या ५ असून या दुकानाची उघडण्याची वेळ सकाळी ८:०० वाजता असून बंद करण्याची वेळ रात्री १०:०० वाजता आहे,एफ एल-२ या दुकानाची संख्या १ असून दुकान उघडण्याची वेळ सकाळी १०:०० वाजता असून बंद करण्याची वेळ रात्री १०:०० वाजता आहे. (३) एफएल-३ या दुकानाची

संख्या शहरांमध्ये १४ असून दुकान उघडण्याची वेळ सकाळी ११:३० असून बंद करण्याची वेळ रात्री ११:०० वाजता आहे.(४) एफएल बीआर-२ या दुकानाची संख्या शहरांमध्ये ५ असून दुकान उघडण्याची वेळ सकाळी १०:०० वाजता असून बंद करण्याची वेळ रात्री १०:०० वाजता आहे. अशाप्रकारे शहरातील दारूचे दुकान उघडण्याचे व बंद करण्याचे शासनाचे नियम असून कारंजा शहरातील व्यवसायिक मात्र या नियमाची ऐशी तैशी करून आपली देशी, विदेशी, बार, बियर शॉपी दुकान चालवत असून यावर अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क अधिकारी माहिती असून सुद्धा कोणती कारवाई झाली नाही.

फक्त दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क मंगरूळपीर हे कोणती कारवाई न करता फक्त हप्ता वसुली करण्याकरता कारंजा शहरात येतात.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. २१ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# १०२ ॲम्ब्युलन्स सेवेसाठी जिल्ह्यात चालकांची कमतरता

**मेहकर :** बुलढाणा जिल्ह्यात कार्यरत १०२ शासकीय ॲम्ब्युलन्स सेवेमध्ये चालकांची मोठ्या प्रमाणावर कमतरता असल्याने रुग्णसेवेवर गंभीर परिणाम होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसचे उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांना निवेदन दिले आहे. जिल्ह्यातील ३० ॲम्ब्युलन्स पैकी केवळ १४ रुग्णवाहिकेवर चालक कार्यरत आहेत. प्रत्यक्षात प्रत्येक ॲम्ब्युलन्ससाठी स्वतंत्र चालकाची आवश्यकता असताना अपुऱ्या मनुष्यबळामुळे अपघातातील गंभीर रुग्णांना वेळेत दवाखान्यात हलविणे कठीण होत आहे. जिल्ह्यात तातडीने १६ नवीन चालकांची नियुक्ती करून आरोग्य सेवा सुरळीत करण्यात यावी. या संदर्भात तात्काळ कार्यवाही करून रुग्णसेवा सक्षम करावी, असे निवेदनात नमूद आहे.

# खामगावात ई– फार्मसीविरोधात मेडिकल बंद ; केमिस्ट संघटनेचा मूक मोर्चा

प्रतिनिधी २१ मे

**खामगाव:** ऑनलाईन औषध विक्री अर्थात ई-फार्मसीच्या विरोधात आज खामगाव शहरासह जिल्हाभरातील औषध विक्रेत्यांनी तीव्र आंदोलन छेडले. विविध मागण्यांसाठी केमिस्ट संघटनेच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला असून, शासनाच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी औषध विक्रेत्यांनी काळ्या फिती लावून आंदोलन केले.

ई-फार्मसीमुळे पारंपरिक मेडिकल व्यवसाय धोक्यात येत असून, ग्राहकांच्या आरोग्याशीही तडजोड होत असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी केला. ऑनलाईन



पद्धतीने डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे विकली जात असल्याने भविष्यात गंभीर परिणाम संभवतात, अशी भूमिका संघटनेने मांडली. या आंदोलनात जिल्हाभरातील अनेक मेडिकल दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली. शहरातून मूक मोर्चा काढत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी (SDO) यांना निवेदन सादर केले. शासनाने ई-फार्मसीवर नियंत्रण आणावे, औषध विक्रीचे नियम कठोर करावेत आणि स्थानिक मेडिकल व्यावसायिकांचे हित जपावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला. या प्रसंगी अमरावती झोनचे संघटन सचिव राजेंद्र नहार, जिल्हा सचिव रामचंद्र आयलाणी, जगदीश नावदर, नंदकिशोर कांडेकर, अजय जैन, सुनील लाहुडकर, गणेश चांडक, नरेश नागवाणी, बाळू पवार, अब्दुल फईम, श्रींकात बाळकर, सय्यद अकील, धर्मेश शहा, ओम राठी, संजय इंगळे, विजय बाधवाणी, जितेंद्र जैन, सौ. शिला बोहरा, रंजनी लाड, मुनाली चौधरी आदी पदाधिकारी व केमिस्ट बांधव मोठ्धा संख्येने उपस्थित होते. याबाबतची माहिती जिल्हा सचिव रामचंद्र आयलाणी यांनी दिली.

# जळगाव जामोद पोलिसांची धडक कारवाई

## कत्तलीसाठी ठेवलेल्या १७ जनावरांची सुटका

प्रतिनिधी २१ मे

**जळगाव जामोद:** शहरातील कुरेशी मोहल्ला भागात कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत निर्दयतेने डांबून ठेवलेल्या १७ जिवंत गोवंश जनावरांची सुटका करण्यात जळगाव जामोद पोलिसांना बुधवारी मोठे यश आले. 'मिशन परिवर्तन' अंतर्गत करण्यात आलेल्या या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल ३ लाख ४५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

जळगाव जामोद पोलिस स्टेशनचे पथक परिसरात पेट्रोलिंग करत होते. यादरम्यान गुप्त बातमीदाराकडून पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, कुरेशी मोहल्ला येथील काही व्यक्तींनी जनावरांना कत्तल करण्याच्या उद्देशाने चारा-पाणी न देता अत्यंत क्रूरपणे बांधून ठेवले. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता, तिथे चारा-पाणी न देता अत्यंत निर्दयी अवस्थेत डांबून ठेवलेली जनावरे आढळून आली.

या जनावरांबाबत सखोल चौकशी केली असता, ही जनावरे शेख शेरा शेख युसूफ (रा. कुरेशी मोहल्ला, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा) याच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीविरुद्ध जळगाव जामोद पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. कारवाई जळगाव जामोदचे पोलिस निरीक्षक नितीन पाटील, पोलिस उपनिरीक्षक नारायण सरकटे, पोउपनि खाडे, पोलिस अंमलदार वेरूळकर, इरफान, नीलेश पुंडे, मोहाळे, मोरे, सचिन राजपूत, ढोण, डब्बे, सोळंके, झालटे, पाटोळे आणि टोगळे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरात अवैध धंदेवाल्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

**१७ जनावरांचे वाचले प्राण**

या धाडीदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ९० हजार रुपये किमतीचे तांबड्या रंगाचे ९ गोरे, १० हजार रुपये किमतीचा पांढऱ्या रंगाची १ गीर बैल, ७० हजार रुपये किमतीचे तांबड्या रंगाचे २ बैल आणि १ लाख ७५ हजार रुपये किमतीचे पांढऱ्या रंगाचे ५ बैल, असा एकूण ३ लाख ४५ हजार रुपये किमतीचा जिवंत गोवंश जप्त केला.

# तायडे कॉलनीत घरफोडी; ३५ हजारांचा ऐवज लंपास

## अज्ञात चोरट्याने बंद घर फोडले; गुन्हा दाखल

प्रतिनिधी २१ मे

**खामगाव:** शहरातील तायडे कॉलनी परिसरात बंद घर फोडून रोख रक्कम व चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाफीउर रेहमान अब्दुल रेहमान शेख (७३), (सेवानिवृत्त शिक्षक, रा. तायडे कॉलनी, खामगाव) हे कुटुंबासह ४ मे रोजी नातेवाईकांकडे छत्रपती संभाजीनगर येथे गेले होते. दरम्यान, त्यांच्या बंद घरावर चोरट्यांनी नजर ठेवून घराच्या दरवाजाचा कडी कोंडा व कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाट फोडून त्यामधील २४ हजार ५०० रुपयांची रोकड, पाच चांदीच्या अंगठ्या अंदाजे ८ हजार रुपये किंमतीच्या तसेच अंदाजे ३ हजार रुपये किमतीचे दोन चांदीचे शिक्के असा एकूण ३५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही चोरी ४ मे रोजी सकाळी ८ ते ६ मे रोजी रात्री ८.३० वाजेदरम्यान घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात येताच शेख यांनी खामगाव शहर पोलिसांत तक्रार दिली. त्यांच्या तोंडी फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१(३) व ३३१(४) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

# पेट्रोलियम पदार्थांची दरवाढ कमी करण्याची शिवसेना (उबाठा) ची केंद्र सरकार, निती आयोगाकडे मागणी

प्रतिनिधी २१ मे

**मलकापुर:** केंद्र सरकार व निती आयोग यांच्याकडे उपविभागीय महसूल अधिकारी संतोष शिंदे यांचे मार्फत शिवसेना (उबाठा) शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात पेट्रोल, डिझेल, गॅसची दरवाढ कमी करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे केली आहे.

शेतकरी, शेतमजूर यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत पेट्रोल , डिझेल,गॅसची भरमसाठ दरवाढ केंद्र सरकार करीत आहे, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशातील नागरिक अती प्रमाणात त्रस्त झालेला आहे व विदर्भात प्रचंड प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहे, सरकार देशाचे कारभार याच पद्धतीने चालवायला लागले तर येणाऱ्या काळात देश



अधोगतीला लागल्याशिवाय राहणार नाही, जगातील इतर देशांनी युद्ध परिस्थितीचा आढावा घेऊन पेट्रोल, डिझेल, गॅस साठा प्रचंड प्रमाणात साठवून ठेवला आहे.त्यामुळे जगातील काही देशावर भारतासारखी परिस्थिती निर्माण झालेली नाही, त्या देशाच्या नीती आयोगाने योग्य निर्णय घेऊन नागरिकांच्या आवश्यकतेला सुरक्षा प्रदान केलेली आहे, केंद्र सरकारला या निवेदनाद्वारे इशारा देण्यात येतो की, देशातील गोरगरीब जनता शेतकरी यांना महागाईची झळ लागणार नाही अशी शिफारस भारताच्या नेत्यांकडे करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने उग्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, उपशहरप्रमुख बाळू पोलाखरे, युवा सेना शहरप्रमुख मंगेश सातव,किसान सेना उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पुरकर, संतोष बाबुसिंग चव्हाण, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, शेख.मोहसीन शेख छोटू,सै.तौफीक सै.रफीक,हसन गौरी, सादीक खान रशीद खान, विजय हरीभाऊ चित्रंग सह आदिंच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# महाडीबीटी योजनेंतर्गत अर्ज करण्यास अखेरचे चार दिवस

## तूर, मूग, उडीदसह विविध अनुदानित बियाण्यांचा लाभ

प्रतिनिधी २१ मे

**खामगाव:** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या 'महाडीबीटी' पोर्टलवर बियाणे मिनी कीट तसेच प्रमाणित बियाणे वितरण योजनेंतर्गत ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्यास आता केवळ चार दिवसांचा अवधी शिल्लक असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ मे आहे.

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभविविध पिकांच्या दर्जेदार बियाण्यांचा अनुदानावर उपलब्ध करून दिला जाणार आहे. बियाणे मिनी कीटमध्ये तूर, मूग आणि उडीद या पिकांच्या कडधान्य बियाण्यांचा



समावेश करण्यात आला आहे, तसेच प्रमाणित बियाणे वितरण योजनेंतर्गत सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे आदी गळीत धान्य पिकांच्या बियाण्यांचे वितरण करण्यात येणार आहे. अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी फार्मर पोर्टलवर आधार क्रमांक आणि ओटीपीच्या साहाय्याने लॉगिन करणे आवश्यक आहे. अर्ज करण्यापूर्वी प्रोफाइल शंभर टक्के अद्ययावत असल्याची खात्री करून घ्यावी. विशेषतः जात प्रवर्ग व दिव्यांगत्वासंदर्भातील माहिती अचूक भरलेली असणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

**अर्जासाठी केवळ २३ रुपये ६० पैसे शुल्क**

'बियाणे वितरण' या पर्यायाची निवड करून तालुका, गाव, सर्व्हे क्रमांक तसेच संबंधित पिकाची माहिती भरावी लागणार आहे. शेतकऱ्यांना एकापेक्षा अधिक गट किंवा पिकांसाठी अर्ज करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व माहिती भरल्यानंतर २३ रुपये ६० पैसे शुल्क भरून अर्ज अंतिम स्वरूपात सादर करता येणार आहे.

**कृषी विभागाचे आवाहन**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी जातीचे प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. एकदा अर्ज सादर केल्यानंतर त्यामधील माहितीमध्ये बदल करता येत नसल्याने अर्ज भरताना काळजीपूर्वक माहिती तपासण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# गाळाची वाहतूक करणारे ट्रॅक्टर सुसाट; अपघातांचा धोका वाढला!

प्रतिनिधी २१ मे

**खामगाव:** शहरालगतच्या जनुना तलावातून गाळाचा उपसा सुरू आहे. या गाळाची वाहतूक करणारे ट्रॅक्टर शहरातील मुख्य मार्गावरून सुसाट धावत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. - विशेषतः वर्दळीच्या मार्गावर गाळाने भरलेले, तसेच रिकामे होऊन परत येणारे ट्रॅक्टर सुसाट वेगाने धावत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या जनुना तलावातील गाळ उपसा काम सुरू असून, मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टरद्वारे गाळाची वाहतूक केली जात आहे; मात्र या वाहतुकीदरम्यान वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याचे दिसून येत - आहे. अनेक ट्रॅक्टर चालक शहरातील - गर्दीच्या रस्त्यांवरून भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याने दुचाकीस्वार, पादचारी तसेच इतर वाहनधारकांना जीव - मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. नांदुरा रोड हा शहरातील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून, येथे दिवसभर वाहतुकीची मोठी वर्दळ असते. विद्यार्थी, व्यापारी, नागरिक आणि लहान-मोठी वाहने या मार्गावरून सतत ये-जा करतात. शहरातून सुरू असलेल्या गाळ वाहतुकीमुळे काही ठिकाणी रस्त्यांवर चिखल साचत असून, त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. गाळाने भरलेल्या काही ट्रॅक्टरमधून गाळ ओसंडून रस्त्यावर पडत असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः दुचाकी घसरून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय ट्रॅक्टरच्या सततच्या वाहतुकीमुळे उडणाऱ्या धुळीचा त्रासही नागरिकांना सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

**पर्यायी मार्ग निश्चित करावा!**

शहरातून सुरू असलेल्या गाळ वाहतुकीमुळे वाढत्या अपघाताच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पोलिस प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे. गाळ वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरसाठी शहराबाहेरील पर्यायी मार्ग निश्चित करण्यात यावा, तसेच वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे काटेकोर पालन करून घेण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# टेंभूर्णा येथे किरकोळ कारणावरून महिलेला मारहाण

प्रतिनिधी २१ मे

**खामगाव:** खामगाव-तालुक्यातील टेभूर्णा येथे रस्त्यावर लोटगाडी उभी केल्याच्या कारणावरून एका महिलेला शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी टेभूर्णा येथील तिघांविरुद्ध खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी वनिता शालीग्राम हिवरकार (४२) व्यवसाय मजुरी, रा. टेभूर्णा या मंगळवार (दि. १९ मे) सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास आपल्या अंगणात झाडझुड करत होत्या. त्यावेळी आरोपी निलेश रामभाऊ हिवरकार याने ठरस्त्यात लोटगाडी का लावली? या कारणावरून वाद घालत शिवीगाळ केली. तसेच लोटगाडी पलटी करून फेकून दिली व फिर्यादीच्या पाठीवर लाथ मारून अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी द्वारकाबाई रामभाऊ हिवरकार हिने फिर्यादीचे केस धरून खाली पाडल्याचे तर रामभाऊ हिवरकार याने शिवीगाळ करून ठतुमचे जगणे मुश्किल करून टाकीन, पुन्हा रस्त्यावर लोटगाडी लावल्यास हातपाय तोडून टाकीनठ अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकों बाळकृष्ण सहदेव फुंडकर करीत आहेत.

# अनुराबादच्या नदी खोलीकरण, भूजल पाणी व्यवस्थापनाची केंद्रीयस्तरावर दखल

प्रतिनिधी २१ मे

मलकापूर : अनुराबाद ग्राम पंचायत व ग्रामस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या बुलढाणा पॅटर्न नदी खोलीकरण आणि भूजल पाणी व्यवस्थापनाचे उल्लेखनीय कार्य करण्यात आले होते. याची दखल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी घेत नागपूर येथे १९ मे रोजी झालेल्या जलक्रांती परिषद २०२६ मध्ये सरपंच यांना निमंत्रित करून त्यांचा गौरव करण्यात आला.

मलकापूरपासून जवळच असलेल्या अनुराबाद ग्रामपंचायत, संपूर्ण गावकरी तसेच नॅशनल हायवे अथॉरिटी जलक्रांती यांच्या पुढाकारातून नदी खोलीकरण, जलसंधारण आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण काम करण्यात आले होते. जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन आणि पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन यामुळे परिसरातील शेती आणि पाणी उपलब्धतेवर सकारात्मक परिणाम झाला आहे. यामुळे परिसरातील व आजू बाजूच्या जवळच असलेल्या खेड्यातील विहिरी, बोअरवेल यांना भरपूर प्रमाणात पाणी उपलब्ध झाले होते. हे उल्लेखनीय कार्य सरपंच ज्ञानदेव ढगे व त्यांच्या सर्व सहकारी ग्रामपंचायत सदस्यांनी, ग्रामस्थांनी करण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्याचअनुषंगाने केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी अनुराबाद येथे केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सरपंच ज्ञानदेव ढगे यांना नागपूर येथे 'जलक्रांती परिषद-२०२६'मध्ये बोलावले होते. प्रमुख उपस्थिती म्हणून ना. नितीन गडकरी, विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द अभिनेते तथा नाम फाउंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर व सचिव मकरंद अनासपुरे यांची उपस्थिती होती. या जलक्रांती परिषद २०२६ च्या विशेष कार्यक्रमाला सरपंच ज्ञानदेव ढगे यांना निमंत्रित करण्यात आले होते. अनुराबाद गावाच्या कार्याची घेतलेली ही दखल संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद मानली जात आहे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**बुलडाणा पॅटर्नची राज्यात वेगळी ओळख**

कृषिमंत्री कै. भाऊसाहेब फुंडकर व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून यशस्वी 'बुलढाणा पॅटर्न'ची पुन्हा राष्ट्रीय पातळीवर चर्चा झाली आहे. नदी खोलीकरण, गाळ काढणे, जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण या संकल्पनेवर आधारित 'बुलढाणा पॅटर्न'ने राज्यभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. अनुराबादच्या उपक्रमामुळे या मॉडेलची पुन्हा नागपूर येथे जलक्रांती परिषदमध्ये विशेष करून सरपंच यांना निमंत्रित केल्याने या कार्याची दखल केंद्रीय पातळीपर्यंत गेली हे उल्लेखनीय.

**काय म्हणाले ना. गडकरी..**

रणथम-नायगाव, अनुराबाद व झोडगा या गावाच्या मधून उंबर नाला होता, या नाल्यावरील अतिक्रमण हटवून या नाल्याचे साडेचार किलोमीटर लांबीकरण खोलीकरण केले. त्यातून काढलेल्या मुरूमामुळे ३५० टीसीएम जलसाठा तयार झाला. उंबर नाल्यालगत १७ एकर जागेमध्ये २५ फुट खोल तलाव बिनाखर्च तयार झाला. त्यामुळे २ ते ३ कि. मी. पर्यंतच्या विहिरींना पाणी आले. असा उल्लेख ना. नितीन गडकरी यांनी नागपूर येथे झालेल्या जलक्रांती परिषद २०२६ च्या कार्यक्रमामध्ये केला.

# खामगावात आजपासून संगीतमय श्रीमद् भागवत कथा महोत्सवाला प्रारंभ

प्रतिनिधी २१ मे

**खामगाव:** गजानन कॉलनी, ग्रामीण पोलीस स्टेशन रोड, खामगाव येथे आज गुरुवार दि. २२ मे २०२६ पासून संगीतमय श्रीमद भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहास उत्साहात प्रारंभ होत आहे. भागवत सेवा मंडळ गजानन कॉलनी व यशोधाम कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कथामहोत्सवासाठी कथावाचक म्हणून ह.भ.प. श्री. बळीरामजी महाराज ढोले (वसाडी) यांच्या रसाळ वाणीमधून भाविकांना भागवत कथेचा आध्यात्मिक लाभ मिळणार आहे. दररोज सायंकाळी ६.३० ते रात्री १० वाजेपर्यंत कथा होणार आहे.

कार्यक्रमादरम्यान सामूहिक पारायण, काकडा आरती, भजन, हरिपाठ तसेच विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संगीत साथीसाठी विविध नामवंत कलाकार सहभागी होणार असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

सांगता सोहळा गुरुवार दि. २८ मे २०२६ रोजी होणार असून सकाळी ग्रंथदिंडी व शोभायात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन ह.भ.प. श्री. प्रशांत महाराज ताकोते (अकोला) यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या पवित्र धार्मिक कार्यक्रमास परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. २१ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# बाई तुमचे आले, आमचे का नाही ?

## ◆लाडक्या बहिणीचे पैसे न आल्याने महिला कासावीस ◆ महिला व बालकल्याण विभागात महिलांची तोबा गर्दी

प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** बाई तुमचे आले आमचे का नाही? आम्ही ई-केवायसी तर केली तरी आमचे पैसे का नाही? आमचे गरिबांचेच पैसे का रोखता? अशा एक ना अनेक प्रश्नांच्या फेऱ्यांना महिला व बाल विकास कल्याण अधिकाऱ्यांना रोज तोंड द्यावे लागत आहे.

जिल्ह्यातील अनेक लाडक्या बहिणींचे मार्च, एप्रिलचे पैसे न आल्याने महिला संतप्त झाल्या असून, अनेकांनी महिला व बालविकास कार्यालयात गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे या महिलांना पैसे का आले नाहीत किंवा त्या अपात्र असतील, तर कोणत्या कारणांनी अपात्र झाल्या ? याची कोणतीही माहिती लाभार्थी महिलांना मिळत नसल्याने संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे.



### मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही

राज्य सरकारची एक गेमचेंजर योजना आहे. या योजनेतील पात्र लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत मिळते. परंतु, गेल्या काही महिन्यांत लाडक्या बहिणींच्या अर्जाची छाननी करण्यात आली. या प्रक्रियेत आतापर्यंत लाखो महिलांची नावे या योजनेतून वगळण्यात आली आहेत. सध्या सरकारने मार्च आणि एप्रिल महिन्याचे पैसे पात्र महिलांच्या बँक खात्यात पाठवले आहेत. परंतु, अनेक महिलांना हे पैसेच मिळालेले नाहीत. ई-केवायसी केली नसल्याने, तसेच अर्जातील इतर त्रुटीमुळे अनेक महिलांना याबाबतचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच महिला व बालविकास कार्यालयात महिला धाव घेत आहेत.

### ई-केवायसीची संधी आता नाही

पैसे न आल्याने शहरातील महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात महिला मोठी गर्दी करत आहेत. पैसे कशामुळे बंद झाले, याची माहिती घेण्यासाठी भर उन्हात महिलांना रांगा लावण्याची वेळ आली आहे. शासनाने दोनदा केवायसीची संधी दिली होती. आता पुन्हा केवायसीसाठी संधी मिळणार नसल्याची माहिती प्रशासनाकडून दिली जात आहे.

### अपात्रतेचे कारण अधिकाऱ्यांनाही माहीत नाही

काही महिला चालू महिन्यापासून अपात्र झाल्या आहेत. परंतु, त्यांना तसा अधिकृत मेसेज पाठवण्यात आलेला नाही. नेमक्या कोणत्या कारणातून अपात्र केले किंवा काय त्रुटी राहिली याची कोणतीही माहिती मिळत नसल्याने महिला पैशांची वाट पाहत आहेत. त्यामुळेच अपात्रतेचे कारण गुलदस्त्यात दिसून येत आहे एवढेच नव्हे तर अधिकारी सुद्धा याबाबत अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे काही महिला चालू महिन्यापासून अपात्र झाल्या आहेत. परंतु, त्यांना तसा अधिकृत मेसेज पाठवण्यात आलेला नाही. नेमक्या कोणत्या कारणातून अपात्र केले किंवा कोणती त्रुटी राहिली याची कोणतीही माहिती मिळत नसल्याने महिला पैशांची वाट पाहत आहेत. त्यामुळेच संभ्रम वाढला आहे.

### तांत्रिक अडचणी कोण दूर करणार ?

काही लाडक्या बहिणींना या योजनेचे पैसे मिळालेले नाहीत. काही महिलांना तर जानेवारी महिन्यापासून योजनेची रक्कम खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळेच महिला संतप्त झाल्य आहेत. केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्याचा दावा महिलांकडून के जात असला, तरी तांत्रिक अडचन आणि अपूर्ण माहितीमुळे अनेक लाभार्थ्यांची लाडकी बहीण योजनेची केवायसी रखडल्याचे समोर येत आहे. या तांत्रिक अडचणी दूर करणार कोण हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे

# इंधनाचा भडका... चोहीकडे महागाई वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी २१ मे



**अकोला :** पेट्रोलियम कंपन्यांनी पहिल्या टप्प्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची तसेच दुसऱ्या टप्प्यात ९० पैशाची वाढ केल्याने व्यापारी आणि सामान्य जनता या दोघांचीही चिंता वाढली आहे. अकोल्याच्या व्यापारी वर्तुळात, ही दरवाढ येत्या काळात मोठ्या प्रमाणावर महागाई वाढण्याचे लक्षण म्हणून पाहिली जात आहे.

डिझेलच्या दरवाढीचा पहिला आणि सर्वात मोठा परिणाम परिवहन आणि वाहतूक क्षेत्रावर होईल. डिझेलच्या दरात ३ रुपयांची वाढ झाल्याने ट्रकचा खर्च वाढणारच आहे. वाहतूक खर्चातील या वाढीमुळे स्थानिक बाजारपेठेत येणाऱ्या भाजीपाला, धान्य, फळे आणि दूध यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढतील. वाढलेल्या मालवाहतुकीचा थेट फटका अखेरीस ट्रक चालकांच्या खिशाला बसेल. वाढत्या डिझेलच्या किमतींचा पुरवठा साखळीवर परिणाम होईल. कच्चा माल मिळवण्याचा आणि तयार माल बाजारात पोहोचवण्याचा खर्च वाढेल. जनरेटर आणि यंत्रसामग्रीमध्ये डिझेलच्या वापरामुळे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन खर्चही लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता आहे. या दरवाढीचा परिणाम केवळ शहरी ग्राहकांवरच नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकऱ्यांवरही होईल. डिझेलच्या दरवाढीचा शेती खर्चावर स्पष्टपणे परिणाम होईल. ट्रॅक्टरने नांगरणी, पेरणी आणि जमीन सपाटीकरण ही सर्व कामे डिझेलवर अवलंबून असतात. प्रति एकर प्रति लिटर ३ रुपयांच्या दरवाढीमुळे शेती खर्चात थेट वाढ होईल. ट्रॅक्टर मालकांनी ताशी भाड्याचे दर आधीच वाढवले आहेत. तसेच शेतकऱ्यांना त्यांचे धान्य, भाजीपाला तसेच फळे शहरातील बाजारांमध्ये पोहोचवण्यासाठी लहान मालवाहू वाहनांवर जसे की टाटा एस आणि पिकअप ट्रक आदिं वर अवलंबून राहावे लागते. डिझेलच्या किमती वाढल्यामुळे या वाहनांचे भाडे वाढेल, ज्यामुळे शेतकऱ्यांचा निव्वळ नफा कमी होईल.

# मराठा सेवा मंडळाद्वारे २७ मे रोजी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** मराठा सेवा मंडळ मागील ४० वर्षापासून मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करीत आहे. जे विद्यार्थी १० वीत ७० टक्के व १२ वीत ६५ टक्केच्या वर गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत त्यांना गुणाक्रमाने प्रथम, द्वितीय व तृतीय असे १० वी व १२ वी करीता रोख स्वरूपात पुरस्कार देण्यात येतील. तसेच उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांना मोमेंटो, प्रमाणपत्र व शालेय साहित्य इत्यादी भेट वस्तु प्रत्येक विद्यार्थ्यांला देण्यात येतील. सदर कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन तसेच पुढील शिक्षणाकरिता उपयोगी ठरणारी सर्व माहिती तसेच शिक्षण क्षेत्रात मिळणाऱ्या सवलती याची संपुर्ण माहिती प्रोजेक्टवर देण्यात येईल.

हा कार्यक्रम २७ मे रोजी सायंकाळी ६.०० वाजता पत्रकार भवन, लक्झरी बस स्टॅन्ड समोर, निमवाडी अकोला येथे होणार आहे. समाजातील गुणवंत प्राप्त विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी २५ मे पर्यंत आपल्या परिसरातील मराठा सेवा मंडळच्या पदाधिकारी राजेश्वर झेरॉक्स मोठ्या पोष्ट ऑफीस समोर, सर्व समाज बांधवांनी आपल्या पाल्याची नोंदणी करण्याचे अवाहन मराठा सेवा मंडळाचे अध्यक्ष मुरलीधर सटाले, महिला कार्यकारिणी अध्यक्षा माधुरीताई बिडवे तसेच मारोतीराव भगत, पंडीत चौधरी, नागोराव लाटे, प्रदीप लुगडे, गजानन थिटे, संजय केंदळे, सुनील चव्हाण, कैलास गाडवे, बाळकृष्ण जाधव, कैलास दळवी, सुर्यकांत चव्हाण, आशिष जाधव, संभाजी खेडकर, निलेश जरांगे यांचेकडे करावी, असे आवाहन मराठा सेवा मंडळ अध्यक्ष तसेच महिला कार्यकारिणी व युवक कार्यकरिणी यांनी केले आहे, असे एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे मंडळाचे सचिव गणेश गिराम यांनी कळविले आहे.

# जिल्हा परिषदेच्या आवारातच जाळली एक्सपायर औषधे


## आरोग्य विभागाचा ढेपाळ कारभार चव्हाट्यावर

प्रतिनिधी २१ मे



**अकोला :** जिल्हा परिषदेच्या आवारातच एक्सपायर झालेल्या औषधीचा साठा मोठ्या प्रमाणात जाळण्यात आलेला आहे हा साठा जाळल्याने कृषी विभाग, शिक्षण, पाणीपुरवठा विभाग तसेच आरोग्य विभाग कार्यालयात धूर पसरल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. अकोला जिल्हा परिषदेच्या आवारात असलेल्या इमारतीच्या मागे कोणीतरी आरोग्य विभागातील एक्सपायर झालेले मेडिसिन चा मोठा साठा जाळण्याचा प्रकार आला आहे. या प्रकारामुळे या चारही विभागांमध्ये जाळण्यात आलेल्या मेडिसिनचा धूर आणि दुर्गंधी पसरल्यानेअधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. नियमानुसार एक्सपायर झालेल्या मेडिसिन ची विल्हेवाट हे योग्य प्रकारे लावणे गरजेचे आहे, पण जिल्ह्यात आरोग्याचे धडे शिकवणाऱ्या जिल्हा परिषदेची आरोग्य यंत्रणेच्या दिव्याखाली अंधार असल्याचे प्रत्यय या प्रकारामुळे समोर आले आहे. ही एक्सपायर झालेली मेडिसिन मानवी शरीराला अनेक प्रकारे धोकादायक असते पण प्राथमिक आरोग्य केंद्रातच नव्हे तर जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाच्या आवारातही ही एक्सपायर मेडिसिन जाळण्याच्या प्रकाराबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी चौकशी करून कारवाई करतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# जुने बसस्थानक परिसरात ऑटो चालकांची मनमानी



प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** जुने बसस्थानक ऑटो चालकांची मनमानी दिसते. वाहने कोठेही उभी करतात. तसेच चुकीच्या दिशेने वाहन काढण्यात येते. टॉवरकडून फतेह चौकाकडे जाताना त्यामुळे अडथळा निर्माण होतो. वेगाने येणाऱ्या वाहन चालकाचा अंदाज चुकला तरी अपघाताची शक्यता असते. याकडे वाहतूक शाखा पोलिसांनी लक्ष देणे आवश्यक आहे. हा भाग खाजगी वाहनांनी व्यापला आहे. शास्त्री स्टेडियम च्या दिशेने खाजगी बसेस बिनधास्त उभ्या राहतात. जुने बसस्थानकाच्या बाजूला देखील त्या पार्क केल्या जातात. शहरातील नागरिकांना त्यामुळे त्रास होतो याची तमा मुळीच बाळगली जात नाही. या भागाला शिस्त लावण्याची गरज आहे. त्याशिवाय लोकांना दिलासा मिळणार नाही.

# प्रेम विवाहाच्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या

प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** अलंकार मार्केट मध्ये तरुणाच्या हत्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने तपास करीत चार आरोपींना ताब्यात घेतले. प्रेमविवाहातून निर्माण झालेल्या कौटुंबिक वादातून हा खून झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. १५ मे रोजी अकोला शहरातील अंलकार मार्केट परिसरातील राजमंदिर बारच्या गल्लीत राहुल कालू सारसर या तरुणावर काही आरोपींनी लोखंडी पाईप व धारदार शस्त्रांनी हल्ला केला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी दाखल केले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून रामदासपेठ पोलीस



ठाण्यात गुन्हा विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी बादशहा सरू पारोचे (३५) याला ताब्यात घेतले. उर्वरित आरोपी फरार असल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने भुसावळ येथे खाना करण्यात आले. जळगाव-भुसावळ महामार्गावर सापळा रचून पोलिसांनी संतोष रामचरण पारोचे (२४) रा. विजय नगर, तारफैल, अकोला, गौरव राहुल करोसीया (१८) आणि हारीश उर्फ हर्शऊ राहुल करोसीया (२०) दोघे रा. आंबेडकर नगर, वरणगाव, जि. जळगाव या आरोपींना अटक केली.

तपासा दरम्यान मृतक राहुल सारसर याने आरोपींच्या

### ◆ चार आरोपींना केली अटक

नातेवाईक युवतीसोबत प्रेमविवाह केल्याने आरोपींमध्ये तीव्र संताप होता. त्यातूनच कट रचून आरोपींनी गैरकायदेशीर जमाव तयार करत नियोजनबद्ध पद्धतीने हत्या केल्याचे उघड झाले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक शंकर शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोलीस उपनिरीक्षक गोपाल जाधव, विष्णू बोडखे, माजीद पठाण, शेख हसन, अब्दुल माजीद, महेंद्र मलीये, किशोर सोनोने, एजाज अहमद, रवि खंडारे, भास्कर धोत्रे, श्रीकांत पातोंड, अमोल दीपके व मनीष ठाकरे यांनी केली.

# अकोट फैल पुलावर अपघातात दुचाकीचे नुकसान

### ◆ ट्रॅफिक पोलिसांचा निष्काळजीपणा समोर



प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** शहरातील अकोट फैल कडे जाणारा पूल हा धोका दायक ठरत आहे, या पुलावर वाहनांची गर्दी दुपारी वाढल्याने अनेक अपघात घडत आहेत. बुधवारी दुपारी असाच एक अपघात या पूलावर झाला. अकोट फैल कडून स्टेशन कडे जात असलेल्या ट्रक चा धक्का बाजूला जाणाऱ्या दुचाकीला लागल्याने दुचाकी अचानक ट्रक च्या खाली आली, सुदैवाने या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला नसून त्याच्या दुचाकीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. अकोट फैल पुलावर वाहतूक व्यवस्था चांगली राहावी या करीता एक पण पोलीस कर्मचारी तैनात नसतो त्याच मुळे हा अपघात घडल्याचा आरोप नागरिकांनी केला असून पोलीस प्रशासनाणे या कडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# महापालिकेसमोर पाण्याचे लोट

प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** शहरातील विविध भागात पाण्याचा नुसता खेळ सुरू आहे. गांधी चौकात चौपाटी म्हणून जो भाग आहे. त्या भागात जलवाहिनी फुटल्याने पाण्याचे लोट वाहत आहेत. येथून पायी चालता येत नाही. तसेच दिवसभरात आठ दहा लोक तरी घसरून पडतात. पाणी वाहून नेण्यासाठी नालीचे बांधकाम करण्यात यावे अशी मागणी परिसरातील विक्रेते करीत आहेत.

### ◆ जलप्रदाय विभाग मात्र निद्रिस्त



महापालिकेच्या समोरच हा भाग असून महापालिका जलप्रदाय विभाग त्याकडे लक्ष देत नाही. तर दुरच्या भागातील रहिवासी, व्यापारी यांनी काय अपेक्षा करावी अशी विचारणा केली जात आहे. गांधी चौक परिसरात जलवाहिनी फुटल्याने पाण्याची नासाडी दररोज होते आहे. मात्र दुरूस्ती काही केली जात नाही हे दुर्दैव आहे.

# रेल्वेतून पडून अनोळखी इसमाचा मृत्यू

प्रतिनिधी २१ मे

**अकोला :** अकोला. माना पोलीस स्टेशन हद्दीतील कुरूम-माना रेल्वे मार्गावरील पोल क्रमांक ६३६/२५-२७ जवळ अप ट्रॅकच्या बाजूला एक अनोळखी पुरुष इसम रेल्वेतून पडून मरण पावला. १९ मे रोजी सकाळी घटना उघडकीस आली. मृत इसमाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असून उंची सुमारे ५ फूट, रंग निमगोरा, बांधा सडपातळ, चेहरा गोल व केस काळे आहेत. मृताच्या अंगात काळ्या चौकडीचा शर्ट व निळ्या रंगाची जीन्स होती. तसेच उजव्या हातावर 'सुदीर' असे गोंदलेले असून हातात काळा धागा आहे. रेल्वे प्रशासनाकडून मेमो प्राप्त झाल्यानंतर माना पोलीस स्टेशन येथे मर्ग क्रमांक ११/२०२६ कमल १९४ ॅएए प्रमाणे नोंद करण्यात आला आहे. संबंधित मृत इसमाची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, नागरिकाना ओळख पटल्यास किंवा सदर इसमाबाबत कोणतीही माहिती असल्यास माना पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# उड्डाणपुलावरून पडून दोन युवक गंभीर जखमी

प्रतिनिधी २१ मे

**अमरावती :** भरधाव घेऊन जाणाऱ्या बुलेट या दुचाकीवरून नियंत्रण सुटल्याने दोन युवक उड्डाणपूल आवरून खाली पडून गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी पाच वाजता दरम्यान घडली आहे. या युवकांवर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. प्राप्त माहितीनुसार गाडगे नगर पंचवटी उड्डाणपुलावरून इरवीन कडे जात असताना सदर घटना घडल्याचे बोलल्या जात आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून उड्डाणपुलावरून वाहने नियंत्रणात हळू चालवावी असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले. उड्डाण

### ◆ गाडगे नगर उड्डाणपुलावर ची घटना



पुलावरून खाली पडल्यानंतर नागरिकांच्या मदतीने दोन्ही युवकांना खाजगी रुग्णाला भरती करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK